

छात्र

# प्रबोधन

वर्ष ४, अंक १
सौर श्रावण, शके १९१७




ज्ञान प्रबोधिनीचे कुमारांसाठी अभिनव मासिक।



काश्मीरचा साहसपूर्ण अभ्यासदौरा
हजरतबाल दर्गा
जम्मू तवी
JAMMU TAWI

ॐ


# छात्र प्रबोधन

*वर्ष ४ अंक १*
*सौर श्रावण, शके १९१७*


इवली शल्ये रुपती खुपती, मात करू दे त्यांच्यावरती
प्रगल्भतेचे पंख लेऊनी ने ज्योतिर्जगतात.


**संपादक, प्रकाशक**
महेन्द्र सेठिया
**संपादक मंडळ**
महेंद्र सेठिया B.E., M.Ed.
विवेक पोंक्षे M.Sc., B.Ed.
अनघा लवळेकर M.A., B.Ed.
शैलजा देशमुख M.A., M.Ed.
**मुखपृष्ठ व आतील चित्रे**
भास्कर सगर, पुणे.
**अक्षर जुळवणी**
प्रिंटर्स हाऊस
७४४ सदा.(हौद), पुणे-३०
**संपर्क**
**'छात्र प्रबोधन'**
ज्ञान प्रबोधिनी
५१० सदाशिव पेठ
पुणे ४११०३०
☎ ४७७६९१
**मुद्रक**
प्रबोध संपदा, पुणे - २.
**वार्षिक वर्गणी**
रु. ७५/-
**या अंकाची किंमत**
रु.६/-
**नोंदणी क्रमांक**
PHM/153/VIII


## या अंकात दडलंय काय?


| | |
|---|---|
| संवाद | २ |
| समृद्धीच्या मार्गावर - उद्योजकांचे उद्योजक | ३ |
| काश्मीर - 'आँखो देखा' हाल! | ८ |
| असे हे गणित - खरे किंवा खोटे | १३ |
| दिनविशेष - राष्ट्रीय शिक्षण दिलं तरच | १५ |
| वाचलेच पाहिजे असे काही... | १७ |
| जगप्रसिद्ध स्त्री-रत्ने भाग १ व २ | |
| कथा - माझा राष्ट्रध्वज, माझा अभिमान | १९ |
| डोळस भटकंती - १ गॅझेटीयर्स (दर्शनिका) | २५ |
| वनौषधी - घरगुती औषधांसाठी उपयुक्त | २९ |
| कविता पानोपानी | ३० |
| विज्ञान उपकरण - थर्माकोल कटर | ३१ |
| अभ्यास आनंददायी होण्यासाठी... | ३३ |
| प्रेरणादायी ध्वज | ३७ |
| ज्ञान व्यवहाराचे - असे उघडले सुरभिने खाते | ३९ |
| कूट श्लोक | ४२ |
| हिंदीकी रोचकता | ४३ |
| मुलांचे पान - 'मी कीटक बोलतोय...' | ४५ |
| स्थानिक कार्यालयांची यादी | ४८ |


घडवू भारत, नटवू भारत, स्वतंत्र भारत, अखंड भारत

## संवाद

*प्रिय प्रबोधक मित्रमैत्रिणींनो,*

*दीर्घ प्रतीक्षेनंतर महाराष्ट्रात जवळपास सर्वच ठिकाणी चांगला पाऊस झाला आणि सृष्टीत पुन्हा नवचैतन्य डोलू लागले. आपल्याही सर्वांच्या मनामध्ये, शरीरामध्ये असं सळसळतं चैतन्य भरभरून राहो यासाठी शुभेच्छा!*

*छात्र प्रबोधनच्या चौथ्या वर्षातला हा पहिला अंक काही नवीन लेखमाला घेऊन आला आहे. प्रख्यात शास्त्रज्ञ, गणितज्ञ, साहित्यिक डॉ.जयंत नारळीकर 'असे हे गणित...असे हे गणिती' या लेखमालेमधून वर्षभर आपल्याला भेटणार आहेत. जगभरातल्या गणितज्ञांना पडलेली कोडी अन् बुद्धीच्या जोरावर त्यांनी शोधलेली उत्तरे या लेखमालेतून तुमच्यापर्यंत पोहोचवणार आहोत. ही लेखमाला तुमच्यामध्ये दडलेल्या गणिती प्रज्ञेला नक्कीच हात घालेल.*

*भटकायला तर आपल्याला सगळ्यांनाच आवडतं. हीच भटकंती अधिक डोळसपणे करता आली तर...! आसपासचा भूभाग, वनस्पती, पक्षी, प्राणी, तारांगण हे सर्व आपल्याला दिसत असतं. कुतूहलापोटी या सर्वांबद्दल माहिती मिळवावी असंही वाटत असतं. प्रसिद्ध गिर्यारोहक, दुर्गप्रेमी, साहित्यिक प्रा.प्र.के.घाणेकर 'डोळस भटकंती' या लेखमालेतून आपल्याला अशा विविध संदर्भ ग्रंथांची क्रमाक्रमाने ओळख करून देणार आहोत.*

*टाटा, बिर्ला, किर्लोस्कर असे मोठमोठे उद्योग समूह ज्यांच्या प्रयत्नांमधून नावारूपाला आले, अशा उद्योगपतींबद्दल आपल्याला विशेष आदर असतो. या उद्योजकांसारखं होण्याचं स्वप्नही अनेकांनी उराशी बाळगलेले असते. एकविसाव्या शतकात भारत वैभवसंपन्न करायचा असेल तर तुमच्यातल्या अनेकांनी उद्योगपती होऊन 'नीतिमंत श्रीमंती' भारतात आणली पाहिजे.*

*अशा रीतीने भारत समृद्ध करण्यात ज्या ज्या उद्योजकांनी मोठा वाटा उचलला आहे. अशांच्या चरित्रातील स्फूर्तिदायक प्रसंगांची गुंफण असलेली लेखमाला 'समृद्धीच्या मार्गावर' या नावाने प्रा. अजित कानिटकर लिहित आहेत. याचा प्रारंभ प्रबोधिनीचे आद्य संचालक मा. आप्पासाहेब पेंडसे यांच्यापासून केला आहे. उद्योजकतेचे बीज प्रबोधिनीच्या कार्यकर्त्यांमध्ये, तत्त्वप्रणालीमध्ये आग्रहपूर्वक ज्यांनी पेरले असे 'आप्पा' हे खरंतर उद्योजकांचे निर्मातेच होते. १९ ऑगस्ट हा आप्पांचा स्मृतिदिन. त्यामुळेही या लेखमालेतील पहिला लेख त्यांच्यावर असणं औचित्यपूर्ण आहे. मुखपृष्ठावरील चित्रही त्यांचेच आहे. त्यांच्या स्मृतिदिनी त्यांच्या या विचाराचे स्मरण करू या. अन् या लेखमालेद्वारे उद्योजक होण्याची स्वप्ने, उर्मी, महत्त्वाकांक्षा, प्रेरणा जपूयात, त्यासाठी आवश्यक ते कष्ट करण्याचा मनोमन निश्चय करूयात!*

*नेहमीच्या सदरांबरोबरच हिंदी व संस्कृतची पाने, देशातील घडामोडींचा अभ्यास व्हावा यासाठी 'अभ्यास देशस्थितीचा' ही लेखमाला या वर्षीच्या अंकामध्ये वाचायला मिळेल.*

*या लेखमाला वाचत असताना वर दिलेली भूमिका, हेतू लक्षात घेऊन तुम्ही हे लेख वाचावेत. त्यावर आवश्यक तो विचार, चिंतन करावे. शिक्षक, मित्र, मैत्रिणी, कुटुंबीय यांच्याशी चर्चा करावी. सुचविलेली कृती करून बघावी, लेखन करावे. तुमच्या प्रतिक्रिया कळवाव्यात. दैनंदिन अभ्यासाबरोबरच याही सर्व गोष्टींसाठी आठवड्याला २-३ तास वेळ राखून ठेवावा. म्हणजे सर्वांगीण विकसनाच्या वाटचालीमध्ये तुम्ही मासिकाचा जाणीवपूर्वक उपयोग करून घेतला असे होईल.*

सस्नेह तुमचा

**(महेन्द्र सेठिया)**

वरती बघता इंद्रधनुचा गोफ दुहेरी विणलासे। मंगल तोरण काय बांधिले नभो मंडपी कुणी भासे।।

# उद्योजकांचे उद्योजक

समृद्धीच्या मार्गावर

अजित ना. कानिटकर

''काय नसता उद्योग करतो आहेस?''
''काही दुसरा धंदा नाही वाटतं?''
''नसत्या उचापती करू नकोस...''

असे संवाद शाळांमध्ये जाणाऱ्या मित्र-मैत्रिणींना नवीन नाहीत. हे संवाद पालकांकडून ऐकावयास मिळतात. शाळांमध्ये अध्यापक आणि समाजात वावरताना आसपासच्या वयस्कर मंडळींकडूनही असे उपदेशाचे शब्द वारंवार कानावर पडतात. या सर्वांचा कळत - नकळत होणारा परिणाम म्हणजे उद्योग, उद्योगधंदा व यांसारख्या शब्दांबद्दल (व्यवसाय, लघुउद्योग, स्वयंरोजगार, कारखानदारी, इत्यादी) आपोआपच आपल्या मनामध्ये एक अढी निर्माण होत जाते. 'उद्योगधंदा' म्हणजे ज्या मुला-मुलींना शाळा - महाविद्यालयात व त्यापुढील आयुष्यात बाकी काहीच करायला जमत नाही अशा (वाया गेलेल्या!) व्यक्तींसाठी एक रस्ता अशी समजूत असणे योग्य आहे का? उद्योगधंदा करणे म्हणजे काही वाईट काम करणे, असे समीकरण का? मुळातच उद्योगव्यवसाय करणे म्हणजे काय, असे उद्योगव्यवसाय सुरू करणाऱ्या व्यक्ती - ज्यांना आपण 'उद्योजक' असे म्हणतो. कोणत्या प्रेरणेने काम करतात, यांसारख्या अनेक प्रश्नांना 'छात्र प्रबोधन' मध्ये सुरू होणाऱ्या एका नव्या लेखमालिकेतून आपण सामोरे जाणार आहोत. या प्रश्नांची उत्तरेही आपण समजून घेणार आहोत. भारतात यशस्वी ठरलेल्या कर्तृत्वसंपन्न उद्योजकांच्या चरित्रांची व त्यांच्या आयुष्यातील वेचक घटनांची ओळख व आढावा या लेखांतून आपण करून घेणार आहोत.

जमशेदजी टाटा, वालचंद हिराचंद, लक्ष्मणराव किर्लोस्कर ही स्वातंत्र्यपूर्व काळातील उद्योजकांची नावे तुम्हाला माहीत असतील. स्वतंत्र भारताच्या औद्योगिक प्रगतीची वाटचाल अभ्यासताना शंतनुराव किर्लोस्कर, जे.आर.डी.टाटा, आबासाहेब गरवारे, भाऊसाहेब पारखे, फिरोदिया अशी नावे चटकन डोळ्यांसमोर येतात.

गेल्या वीस - पंचवीस वर्षांमध्ये


फडफड करूनी भिजले आपुले पंख पाखरे सावरिती। सुंदर हरिणी हिरव्या कुरणी निजबाळांसह बागडती।

राहुल बजाज, रतन टाटा, धीरूभाई अंबानी यांसारख्या उद्योजकांची नावे प्रसिद्धीस आली आहेत.

'छात्र प्रबोधन' च्या प्रत्येक अंकात आपण एका उद्योजकाचा परिचय करून घेणार आहोत. अशा कर्तृत्वसंपन्न, यशस्वी उद्योजकांच्या धडपडीतून आपणास एक प्रबोधक म्हणून काही बोध घेता येतो का हे पाहणार आहोत. हे सर्व उद्योजक महाराष्ट्रातील व देशाच्या अन्य राज्यांमधीलही आहेत. त्यांच्या प्रगतीचा आलेख वाचत असताना आपल्यापैकी प्रत्येकाच्या मनात त्यांच्यासारखाच पराक्रम करण्याची उर्मी जागृत व्हावी, असा ही लेखमालिका सुरू करण्यामागचा उद्देश आहे.

या कथामालिकेची सुरुवात आपण करणार आहोत एका आगळ्यावेगळ्या उद्योजकापासून. हा उद्योजक स्वत: संन्यस्त वृत्तीचा होता, पण त्याने निर्माण केलेल्या व्यवसायाची उलाढाल होती हजारो-लाखो रुपयांची! त्याने निर्माण केलेल्या खटाटोपातून अनेक हातांना कामही मिळाले. पण ही सर्व धडपड करणारा हा उद्योजक - कारखानदार स्वत:साठी घर - गाडी - ऐषारामाच्या व चैनीच्या वस्तू - 'बँकेत पुष्कळसे पैसे यापैकी कोणतीही गोष्ट मिळविण्यासाठी जगला नाही. त्याने उभारलेले उद्योगही होते एका वैशिष्ट्यपूर्ण उद्दिष्टासाठी. ते उद्दिष्ट म्हणजे समाजपरिवर्तनासाठी काम करणाऱ्या शिक्षण संघटनेला पैशाची कधीच वानवा पडू नये, यासाठी आवश्यक असणारी 'स्वयंपूर्णता' मिळविणे ! म्हणून या लेखमालिकेतील प्रथम अशा एका 'उद्योजकांच्या उद्योजकाची' ओळख करून घेणार आहोत. त्यांचे नाव आहे आपल्या ज्ञान प्रबोधिनीचे संस्थापक-संचालक कै.डॉ.वि.वि. तथा आप्पासाहेब पेंडसे.

आज प्रबोधिनीचे पुण्यात आणि पुण्याबाहेर खेड-शिवापूर येथे विविध उद्योग आहेत. शिवापूर येथील यंत्रशाळा, पुण्यातील क्षणमाप, मुद्रण व



उद्‌वाहक विभाग इत्यादी. या विभागांची थोडी ओळख 'छात्र प्रबोधनच्या' मागच्या अंकांमधून आपण करून घेतली आहे. सरकारी मदत आणि देणग्या यावर अवलंबून न राहता विविध क्षेत्रांत प्रयोग करण्यासाठी जे स्वातंत्र्य लागते ते स्वत: चालवलेल्या उद्योगातून पैसा निर्माण करून मिळवू, या विचारातून प्रबोधिनीतील उद्योगांची रचना झाली. शिवापूर येथील यंत्रशाळेची सुरुवात एका गंमतीशीर



प्रसंगातून झाली.

१९७१ मध्ये आप्पा किर्लोस्कर यांना भेटायला गेले. त्यावेळी त्यांचा संवाद असा झाला :

**आप्पा :** तुम्ही आम्हाला दहा यंत्रे चालवायला द्या.

**शंतनुराव :** यंत्रे म्हणजे काय गळ्यात घालायचे दागिने आहेत?

**आप्पा :** ही यंत्रे आम्ही चालवू, त्यावर कारखान्यांना लागणाऱ्या सुट्ट्या भागांचे उत्पादन करू, त्याच्या विक्रीतून शैक्षणिक कामास लागणारा पैसा उभा करू.

**शंतनुराव :** तुम्ही शिक्षक मंडळी – तुम्हाला उद्योग चालविण्याचा अनुभव नाही. तुम्हाला जमणार नाही.

**आप्पा :** आमची मुले शिकतील, त्यांना तुम्ही काही काळ प्रशिक्षण द्या. मला खात्री आहे हे काम आम्हाला जमेल.

शंतनुरावांना ही कल्पना आवडली. पंचवीस वर्षांपूर्वी शिवापूरच्या उघड्या माळरानावर ग्रामीण भागातील या पहिल्या उद्योगाची पायाभरणी झाली. त्यावेळेस तर वीज, पाणी, रस्ते, इमारती यांचेही काही पाठबळ नव्हते. **पण प्रतिकूल परिस्थितीत न डगमगता एखाद्या स्वप्नाचा पाठपुरावा करणे हे तर**

**खऱ्या उद्योजकाचेच लक्षण.**

त्यावेळेस काही मोजक्या यंत्रानिशी सुरू झालेली प्रबोधिनीची यंत्रशाळा आज पंचवीस वर्षे पूर्ण करण्याच्या उंबरठ्यावर आहे. आज अनेक यंत्रांची त्यात भर पडली आहे. ग्रामीण भागात औद्योगिक क्रांती घरोघरी पोचवण्याचे आप्पांचे स्वप्न साकार करणारे ते एक मोठे प्रभावी माध्यम झाले आहे. या यंत्रालयात अनुभव घेऊन स्वत:च्या गावात स्वतंत्रपणे छोटे व्यवसाय सुरू करणारे पंचवीस तरी उद्योजक आज शिवापूर परिसरात आहेत.

आप्पांच्या - उद्योजकांच्या अशा पुष्कळ आठवणी लिहिता येतील. फटाका विक्री, राखी विक्री हे उपक्रम आपण युवक विभागात दरवर्षी करतो. पण त्याची सुरुवात कशी झाली हे तुमच्यापैकी कोणालाच माहिती नसेल.

१९७५-७६ मध्ये युवक विभागात दलांवर काम करणारे सर्व कार्यकर्ते दिवाळीच्या सुट्टीत काय काय उपक्रम करावेत या विचारात होते. सर्व महाराष्ट्रभर जिल्ह्या-जिल्ह्यात जाऊन अभ्यासदौरे करावेत आणि दौऱ्यांच्या शेवटी वर्धा येथे पवनार आश्रमात पूजनीय विनोबाजींचे आशीर्वाद घ्यावेत अशी कल्पना होती. पण प्रत्येकासच पैशांची अडचण होती. कोणी तरी कल्पना लढवली की फटाके विकून त्या मिळालेल्या नफ्यातून दौऱ्याचा खर्च भागवता येईल.

आप्पांमधल्या 'उद्योजकाच्या' नजरेस ही कल्पना भावली. त्यांनी या कल्पनेस पुरेपूर पाठबळ दिले. पुण्यातीलच बाजारपेठेतून घाऊक भावात खरेदी करून घरोघरी फटाके पोचविण्याचे काम युवक कार्यकर्त्यांनी केले. अपेक्षेप्रमाणे नफा मिळाला व त्यातून महाराष्ट्र दौरा यशस्वी झाला. यातूनच उद्योजकतेचे एक बीज आप्पांनी सर्व कार्यकर्त्यांच्या मनात हळुवारपणे पेरले. या बीजाची वाढ म्हणजे शिवकाशी येथून फटाके खरेदी करणे, पुण्यात सारसबाग येथे महिनाभर विक्रीकेंद्र उघडणे इत्यादी. आज फटाकेविक्री हा प्रबोधिनीचा नित्याच्या सवयीचा व परिचयाचा उपक्रम झाला आहे. पण त्याचे मूळ त्या एका कल्पनेत व त्या कल्पनांना पाठबळ देणाऱ्या उद्योजक वृत्तीत आहे.

युवती विभागाच्या कार्यकर्त्यांपैकी काहींनी दिवाळीसाठी प्रायोगिक तत्त्वावर खाद्यपदार्थ तयार केले होते. जांभळाचा अर्क काढून त्याचे सरबत, चंपाकळी, विविध प्रकारच्या बर्फी त्यांनी करून पाहिल्या. आप्पांमधल्या उद्योजकाने या

प्रयोगामधील नावीन्य व क्षमता हेरली. त्यांनी या कार्यकर्त्यांना आवाहन केले की यातून ‘रसमयी’ उद्योगासारखा अन्नपदार्थांवर प्रक्रिया करणारा उद्योग सुरू होऊ शकेल. तसा तो उद्योग काही वर्षे चाललाही.

**नवनवीन स्वप्ने पाहणे, त्या स्वप्नांचा ध्यास घेत साधनसंपदा जमवणे, प्रसंगी अशक्य वाटेल अशी कामे पत्करणे** हा आप्पांचा स्थायी स्वभाव होता. शिवापूर हे जसे शिवगंगा खोऱ्यातील कामाचे केंद्रस्थळ व शिवापूरच्या कारखान्याद्वारे शिवगंगा परिसरात जसे ग्रामीण विकासाचे प्रयोग करता येतात तसे प्रयोग तोरणा – राजगडच्या परिसरातील गुंजवणी नदीच्या गुंजवणी खोऱ्यात करावेत हे आप्पांचे एक स्वप्न. त्यासाठी करंजावणे येथे एक खांडसरी साखर उत्पादनाचा कारखाना काढावा अशी त्यांची इच्छा होती. साखर कारखाना यशस्वी होण्यासाठी आजूबाजूच्या परिसरात ऊस हवा, रस्त्यांची चांगली सोय असावी, शेतीसाठी पाणीही मुबलक असावे. त्यावेळेस करंजावणे येथे हा खांडसरी उद्योग सुरू करताना यापैकी काही घटक अनुकूल नव्हता. तरीही ‘नाहीचे हो करून दाखवू’ या जिद्दीने आप्पा, त्यांचे सहकारी मा. आण्णा ताम्हनकर, रामभाऊ डिंबळे, सुभाषराव देशपांडे, अनंतराव अभंग यांनी रात्रंदिवस कष्ट करून हे स्वप्न साकार करण्याचा प्रयत्न केला. दुर्दैवाने हा प्रयत्न यशस्वी होऊ शकला नाही व त्यात प्रबोधिनीस माघार घ्यावी लागली. याची चिकित्सा उद्योजकतेचा अभ्यास करणाऱ्यांनी निश्चित करावी. पण विचार करताना आजही राहून राहून आश्चर्य असे वाटते की, वीस वर्षांपूर्वी आप्पांनी ‘ग्रिंडलेज बँक’ या एका परदेशी बँकेच्या मुंबईतील शाखेच्या अधिकाऱ्यांना हा प्रकल्प कसा पटवून दिला? या बँकेने साखर कारखान्यासाठी अर्थसाहाय्य दिले ते कोणत्या भरवशावर? या स्वप्नांमध्ये इतके अनेक भागीदार आप्पांनी कोणत्या ताकदीवर जोडले? या सर्व प्रश्नांची उत्तरे आप्पांच्या व्यक्तिमत्त्वात सापडतील.

अशा या ‘उद्योजकांच्या उद्योजकाचे’ पुण्यस्मरण १९ ऑगस्टला आपण करणार आहोत. प्रबोधिनीच्या तालमीत तयार होऊन शिकलेले अनेक प्रबोधक आज मोठ्या उद्योगांचे मालक व चालक आहेत. प्रबोधिनीत उद्योजकतेचे हे बीज पेरणाऱ्या जोपासणाऱ्या व वाढवणाऱ्या त्या उद्योजकास कृतज्ञ प्रणाम !!

## अभ्यास देशस्थितीचा

# काश्मीरचा 'आँखों देखा' हाल !

**सचिन गाडगीळ**

दिनांक ६ जुलै १९९५, संध्याकाळी ७.३० ची वेळ, मी व अच्युत श्रीनगरमधील वर्तमानपत्रांची कार्यालये असणाऱ्या प्रताप पार्क वसाहतीत 'ग्रेटर काश्मीर' या वृत्तपत्राच्या संपादकांशी चर्चा करत होतो. अचानक जिन्यात धाडधाड होऊन धिप्पाड शरीरयष्टीचे चार तरुण थंड नजरेने आत शिरले. काश्मिरी भाषेत काहीतरी बाचाबाची झाली, वातावरणातील तणाव वाढला. दोन - पाच मिनिटात हे तरुण त्यांच्या टाटा मिनी बसमधून वेगाने पसार झाले. मात्र जाताना आमच्या समोर 'ग्रेटर काश्मीर'चे सहसंपादक व 'निद्रा - ए - मुश्रीक' चे संपादक यांना पळवून घेऊन गेले.

डोळ्यांवर विश्वास बसत नव्हता. अशा अपहरण नाट्याच्या बातम्या किंवा कथा आजपर्यंत फक्त ऐकल्या - वाचल्या होत्या. पण प्रत्यक्ष 'याचि देहि याचि डोळा' हा अनुभव सुन्न करणारा होता. मुलाखत अर्धवट राहिली. रात्री टिपणं वाचताना ''काश्मिर में आज कोई सुरक्षित नहीं। आबाद नहीं। हम दो गनोंके बीच पीसे जा रहे हैं।'' या वाक्याचा अर्थ घुमत राहिला.

पुण्याच्या सुसंस्कृत, सुरक्षित वातावरणात बसून देशस्थितीच्या गप्पा मारणे सोपे, पण प्रत्यक्ष युद्धसदृश परिस्थितीत काश्मीरमध्ये निर्भीडपणे काम करणे महाकठीण आहे. या घटनेनंतर रात्री झोप लागणे शक्यच नव्हते. मनात १९४७ पासूनच्या काश्मीरचे चित्र उभे राहात होते. डोळ्यांसमोर ते दोन संपादक, क्रूर, थंड नजरेचे अतिरेकी व मिनीबसमधील 'एके - ४७' फेर धरून नाचत होत्या.

पुण्यात बसून काश्मीरच्या इतिहासाचा पुरेसा अभ्यास केला होता. काश्मीर समस्येची सुरुवात १५ ऑगस्ट १९४७ रोजी झाली. त्यावेळचे काश्मीरचे महाराजा हरिसिंह यांनी काश्मीरचा भारत किंवा पाकिस्तानात समावेश न करता ''जैसे थे'' स्थिती

मेघराजा गरजला हुंदका आकाशी फुटता, थेंब अमृताचा बरसला।

कायम ठेवण्याचा प्रयत्न केला. त्यांच्या मनात स्वतंत्र, स्वायत्त काश्मीर संस्थानाचे स्वप्न होते. परंतु पाकिस्तानने छुप्या टोळीवाल्यांच्या नावाखाली काश्मीरवर सशस्त्र आक्रमण केले. महाराजांचे सैन्य या क्रूर सेनेसमोर टिकाव धरू शकले नाही व काही तासांत काश्मीर पूर्णपणे पाकिस्तानात सामील होण्याची स्थिती असताना महाराजांनी नाइलाजास्तव भारताची मदत मागितली. काश्मीरच्या विलीनीकरणास मान्यता दिल्यानंतर भारतीय लष्कराने पराक्रमाची पराकाष्ठा करून पाकिस्तानी सैन्याला हुसकून लावले. १९४७ साली २७ ऑक्टोबरला जेव्हा सामिलीकरणाचा करार झाला, त्यावेळी काश्मिरी जनता बहुसंख्य मुस्लिम तर राजा डोग्रा हिंदू होता. भारत सरकारने फक्त राजाच्या इच्छेला किंमत न देता जनतेच्या मताला महत्त्व यावे यासाठी सार्वमत घेण्याचे मान्य केले. सार्वमताच्या आश्वासनाचा सोपा अर्थ म्हणजे ''इथली जनता स्वत: ठरवेल की तिला भारताबरोबर राहावयाचे आहे अथवा नाही'' याचा आश्वासनावरून सध्या काश्मीरमध्ये वादळ चालू आहे.

काश्मीर संदर्भातील दुसरा वादग्रस्त मुद्दा म्हणजे ३७० वे कलम. ३७० वे कलम हे भारतीय राज्य घटनेतील एक वैशिष्ट्यपूर्ण कलम आहे. जम्मू - काश्मीर राज्याला विशेष दर्जा देणारे हे कलम. हे कलम राज्यघटनेत 'बदलत्या परिस्थितीचा विचार करून तात्पुरते समाविष्ट करण्यात आले आहे.' या कलमातील प्रमुख तरतुदींनुसार जम्मू - काश्मीरला स्वतंत्र ध्वज, स्वतंत्र राज्यघटना असण्याचा हक्क व तेथील राज्यपालाला 'सदर इ - रियासत' व मुख्यमंत्र्याला 'प्रधानमंत्री' म्हणण्याचे



स्वातंत्र्य होते. तसेच उर्वरित भारतातील नागरिक जम्मू - काश्मिर सरकारच्या परवानगीशिवाय या राज्यात मालमत्ता खरेदी करू शकत नाही. या कलमाद्वारे भारतीय संविधान व केंद्र सरकारच्या सर्व कायद्यांना येथील विधानसभेची मान्यता असावी लागते. थोडक्यात जम्मू - काश्मिरचे वेगळेपण

'काश्मिरियत' जपण्याची सोय या कलम ३७० मध्ये आहे.

१९५२ मधील शेख अब्दुल्ला व पंडित नेहरू यांच्यातील करारापासून या कलमाचा प्रभाव कमी करण्यास सुरुवात झाली. सध्या स्थावर मालमत्ता खरेदी व नागरिकत्वाचे हक्क सोडून कोणताही वेगळेपणा या राज्यात शिल्लक नाही. भारतीय राज्यघटना, सर्वोच्च न्यायालयाचे निर्णय हे येथील जनतेला लागू झाले आहेत. यालाच स्वातंत्र्यावरचा घाला समजून काश्मीरमध्ये विघटनवादी शक्तींनी असंतोषाचा फायदा घेत अराजक माजवले आहे.


भारताच्या स्वातंत्र्यानंतरचा इतिहास पाहिला तर १९४८, १९६५ व १९७१ च्या भारत - पाकिस्तान युद्धांमध्ये स्थानिक काश्मिरी जनतेने भारतीय लष्कराला खूप मदत केली. नंतर १९७४ ते ८४ या काळात काश्मीरमध्ये शांतता नांदत होती, पर्यटन व्यवसाय तेजीत होता. १९८४ पासून हे चित्र पालटायला सुरुवात झाली. १९८८-८९ पासून सशस्त्र हिंसाचारास सुरुवात झाली. काश्मीरमधील सरकार कोसळून राष्ट्रपती राजवट लागू झाली व काश्मीर खोऱ्यामध्ये भारतीय लष्कर तैनात केले गेले. गेली ६ वर्षे आपले सुरक्षा सैनिक या खोऱ्यामध्ये पाकिस्तानी गुप्तहेर संघटना आय.एस.आय.च्या 'टोपाक योजने' विरुद्ध अतिरेक्यांशी झुंजत आहेत. गेल्या वर्ष दोन वर्षात पाकव्याप्त काश्मीरमधून प्रशिक्षण व अत्याधुनिक शस्त्रास्त्रे घेऊन या खोऱ्यात दहशतवाद पसरतोय. हजरतबाल दर्गा किंवा चरार-ए-शरीफ, जामा मशिदीसारख्या प्रार्थना स्थळांचा अशा विघटनवादी अतिरेकी कारवायांसाठी वापर होण्याचे सत्र सुरू झाले आहे. 'मस्त गुल' सारखे अफगाणी, सुदानी भाडोत्री अतिरेकी काश्मिरी खोऱ्यात दहशत पसरवत आहेत. दररोज वर्तमानपत्रामध्ये राज्यात काही डझन तरी लोकं मृत्युमुखी पडल्याची बातमी असते. अशा पार्श्वभूमीवर निवडणुका घेण्याचा प्रयत्नही सुरू असल्याने अस्वस्थ होऊन

प्रबोधिनीच्या आम्ही सात युवक कार्यकर्त्यांनी काश्मीर अभ्यास दौऱ्यावर जायचे ठरविले.

प्रबोधिनीमध्ये अशा प्रकारच्या अभ्यासदौऱ्यांना नेहमीच पाठिंबा मिळतो. अभ्यासदौऱ्याच्या निमित्ताने भारतातील विविध प्रांतामध्ये प्रत्यक्ष जाऊन तेथील प्रश्न समजावून घेणे व ते प्रश्न सोडविण्यासाठी आपापल्या शक्तीनुसार काम करणे हा या मागचा उद्देश असतो.

भारताच्या उत्तर टोकाला जायचे, इतक्या गंभीर प्रश्नाचा अभ्यास करायचा म्हणजे पूर्वतयारी हवीच. पुण्यात आम्ही सर्वांनी काश्मीर संदर्भात वाचन केले. काश्मीरचे माजी राज्यपाल जगमोहन यांचे 'धुमसते बर्फ', 'समाज प्रबोधन पत्रिकेचा काश्मीर विशेषांक' तर निवृत्त लष्करी अधिकारी, काश्मीरवर लेखन करणारे पुण्यातील पत्रकार, यांना भेटून, चर्चा करून दौऱ्याचे नियोजन केले.

या अभ्यासदौऱ्याला जायचे म्हणजे साहस, धोका व अपरिचित प्रांतात भटकताना शारीरिक, मानसिक तयारी हवी. दौऱ्याला निघालेले आम्ही सर्व युवक पदवीची परीक्षा संपवून नव्या क्षेत्रात पदार्पण करण्यापूर्वी असा अनोखा अनुभव घेण्यास बाहेर पडलो.



पुण्यातून झेलम एक्सप्रेसने आम्ही सात मराठी वीर दौडत निघालो. २७ जूनला तब्बल ४९ तासांच्या रेल्वे प्रवासात महाराष्ट्र, मध्यप्रदेश, उत्तरप्रदेश, दिल्ली, पंजाब, हरियाणा व हिमाचल प्रदेश ओलांडून आम्ही जम्मूला पोहोचलो. जम्मूतून प्रवास व हालचालींच्या सोयींसाठी पुढे तीन गटांत विभक्त झालो. गणेश जाधव, प्रसाद कुलकर्णी व दीपक बिडकर हे पूर्वेकडे दोडा व किश्तवाड भागात गेले. सध्या सर्वाधिक घातपाती व दहशतवादी कारवाया या जिल्ह्यात सुरू आहेत. प्रफुल्ल हंडेदेशमुख व मुकेश कणसकर

यांनी उधमपूर, सीमेवरील राजौरी करून पंजाबात अमृतसरला जाऊन दिल्ली गाठली. मी स्वत: व अच्युत हिरवे श्रीनगरला तळ ठोकून अनंतनाग, बारामुल्ला, चरार-ए-शरीक व हजरतबाल या अत्यंत संवेदनशील भागात गेलो. आम्ही सर्वजण आपापल्या क्षेत्रांत आठ दिवस अभ्यास करून दिल्लीत एकत्र जमलो.

आठ दिवसांत अतर्क्य वाटणारे, विस्मयजनक आणि मन उद्विग्न करणारे अनुभव आले होते. अनंतनागमधील गवत कापणाऱ्या सामान्य माणसाची 'भारतने जुलुम किया है। हम आजादी लेके रहेंगे।' ही आरोळी तर आझम इन्कलाबी सारख्या खोऱ्यातल्या पहिल्या अतिरेक्याची 'अगर एक साल में मसला हल न हुआ तो आपके भारत को नया प्रधान मंत्री ढूँढना पडेगा। ही धमकी मनात घर करून होती. जमात - ए - इस्लामी या कडव्या धर्मनिष्ठ, पाकिस्तानप्रणित संघटनेचे सर्वेसर्वा व सुप्रीम कमांडर सईद अली शाह गिलानी यांनी मुलाखतीत दाखवलेला निर्धार मन सुन्न करणारा आहे. श्रीनगरचे जिल्हाधिकारी व दोडा जिल्ह्याचे आयुक्त यांनी केलेले समस्येचे मूल्यमापन तसेच लष्करी अधिकाऱ्यांचा आत्मविश्वास 'आम्हाला पूर्ण अधिकार द्या. एक महिन्यात काश्मीर नि:शस्त्र करतो.' हे मनाला थोडी उभारी आणणारे होते.

पृथ्वीवरील स्वर्ग, भारताच्या नंदनवनात अतिरेकी राक्षसांनी घातलेला धुमाकूळ प्रत्ययास आला होता. रात्री ७ ते सकाळी ७ मुख्य शहरात संचारबंदी. दर १५ मीटरवर असणारे सुरक्षा सैनिकांचे बंकर्स, तळ बघितल्यावर नयनमनाहेर निसर्गाचा मनमोकळा आस्वाद घेणे अवघड होते.

जम्मू - काश्मीरमधील सर्वसामान्य नागरिक, विद्यार्थी, प्राध्यापक, पत्रकार, संपादक, दुकानदार, महिला, हाऊसबोटवाले, टॅक्सीचालक, अतिरेकी संघटनांचे प्रवक्ते, राजकीय नेते, धार्मिक नेते, विविध प्रशासकीय अधिकारी यांची या जटिल समस्येविषयीची मते परस्पर विरोधी, टोकाची आहेत. जम्मू, उधमपूरमधील निर्वासित हिंदूंचे हालाखीचे अनुभव व दिल्लीतील अटलबिहारी वाजपेयी, राजेश पायलट व सैय्यद शहाबुद्दीन यांच्यासारख्या राजकीय पुढाऱ्यांची मते पुढच्या अंकात वाचू या!

(क्रमश:)

निर्झरपणाचे थिल्लर पाणी गाते आहे श्रावण गाणी, श्रावण आला ! श्रावण आला !

# खरे किंवा खोटे

असे हे गणित ..असे हे गणिती

**डॉ. जयंत नारळीकर**

**आ**पण सामान्यपणे असे गृहीत धरतो की, एखादे विधान खरे तरी असेल किंवा खोटे. कधी कधी गणितात एखादे प्रमेय सिद्ध करायचे असेल तर आपण प्रमेयातील विधान असत्य मानून त्यातून एखादी चूक दर्शवतो आणि म्हणून ते विधान असत्य असणार नाही असे म्हणतो आणि ज्या अर्थी ते विधान असत्य नाही त्या अर्थी ते सत्यच असणार असा निष्कर्ष काढतो.

याचे एक उदाहरण पाहा!

आपल्याला सिद्ध करायचे आहे की, अविभाज्य संख्या अनंत आहेत. इथे अविभाज्य संख्या म्हणजे जिचे 1 आणि ती संख्या वगळता आणखी गुणक नाहीत. उदाहरणार्थ 5, 13, 71 ह्या अविभाज्य आहेत पण

6 ( = 2 × 3),

52 ( = 13 × 4) किंवा

72 ( = 24 × 3) अविभाज्य नव्हेत

हे विधान सिद्ध करायला आपण ग्रीक गणिती युक्लिडने वापरलेली पद्धत पाहू. समजा विधान चूक आहे. म्हणजे अविभाज्य संख्यांची संख्या अनंत नसून मर्यादित आहे. याचा अर्थ त्यात सर्वात मोठी अविभाज्य संख्या असणार. आपण तिला P ह्या अक्षराने दर्शवू. आता खालील संख्या पाहा.

N = ( 3 × 5 × 7 × 11 × 13 × ---------- × P ) + 1

याचा अर्थ, सर्व अविभाज्य संख्यांचा गुणाकार करून त्यात 1 मिळवा. ह्या N ला कुठल्याही अविभाज्य संख्येने भागले तर 1 उरतो.

याचा अर्थ, N चे गुणक (3, 5, 7, --------, P) ह्या सर्व अविभाज्य संख्यांच्या संचात नाहीत. तेव्हा दोन पर्यायी निष्कर्ष निघतात.

A) N ही एक अविभाज्य संख्या आहे.

B)  ला भागणारी एक अविभाज्य संख्या (3, 5, 7, ..........P) ह्या संचात नाही.

परंतु हे दोन्ही पर्याय आपला निष्कर्ष "P सर्वात मोठी अविभाज्य संख्या आहे'' चूक ठरवतात. म्हणून मूळ विधान

चूक नाही. तेव्हा बरोबर असणार.

**रसेलचा विरोधाभास**

बर्ट्रंड रसेल ह्या गणिती तत्त्ववेत्त्याने गणिताचा तर्कशास्त्राच्या दृष्टिकोनातून अभ्यास केला तेव्हा त्याला वर वापरलेल्या तर्कशास्त्रात काही खाचाखोचा दिसल्या. एखादे विधान खरे किंवा खोटे ह्या दोन पर्यायातच बसते असे नेहमी ठामपणे सांगता येणार नाही. रसेलने संचांच्या बाबतीत असे एक विधान केले. ते विधान आपण गणिती भाषेत न पाहता दैनंदिन जीवनातल्या व्यावहारिक दृष्टीतून पाहू.

कल्पना करा, एका खेड्यात एकच न्हावी आहे आणि तो म्हणतो की ''खेड्यातल्या अशा सर्व लोकांची आणि केवळ अशाच लोकांची दाढी करणार जे स्वत:ची दाढी स्वत: करीत नाहीत.''

मग हा न्हावी स्वत:ची दाढी स्वत: करतो का?

विचार करून पाहा. 'होय' आणि 'नाही' दोनही पर्याय इथे लागू पडत नाहीत!

रड्डीगोर ऑपेऱ्यातला विरोधाभास

जेव्हा असे दोन्ही पर्याय चुकतात तेव्हा विरोधाभास निर्माण होतो. ज्यातून मार्ग काढायला मूळ विधानच तपासून कधी कधी बदलावे लागते. गिल्बर्ट आणि सलिव्हन ह्या दोघांनी एकोणीसाव्या शतकात विनोदी संगीत नाटके (ऑपेरा) लिहिली. त्यांतील 'रड्डीगोर' नाटकात असा एक विरोधाभास होता. ती गोष्ट अशी:

एका गावाचा मुख्य सरदार स्वभावाने चांगला पण गुन्हेगारीकरता कुविख्यात होता. त्याला एका चतुर माणसाने विचारले, ''तू वागायला इतका सज्जन पण तरी गुन्हे का करतोस?

तो दु:खाने नि:श्वास टाकून म्हणाला ''काय करू? माझ्या घराण्याला शापच आहे. कुटुंबप्रमुखाने जर रोज एक गुन्हा केला नाही तर त्याला रात्री अत्यंत कष्टदायक मरण येणार. तेव्हा नाइलाजाने मी रोज एक दुष्कृत्य करतो.''

थोडा विचार करून तो चतुर माणूस म्हणाला, ''यातून मार्ग निघतो. तू कुठलेही दुष्कृत्य करू नकोस! याचा अर्थ तू जाणून बुजून मृत्यू ओढवून घेणार. म्हणजे आत्महत्त्येला प्रवृत्त होणार. पण आत्महत्त्या करू पाहणे हाही गुन्हाच नव्हे का? तेव्हा तुला कसलीही भीती नाही.''

अशातऱ्हेने सरदारसाहेब दुष्कृत्यांच्या परंपरेतून सुटले.

**आधुनिक काळात एक पर्याय असा आहे ज्यातून हा विरोधाभास निर्माण होत नाही....शोधा.**

दिनविशेष

# राष्ट्रीय शिक्षण दिलं तरच ...!

**लो**कमान्य टिळक गावोगावी वेगवेगळ्या विषयांवर व्याख्याने देत विषय कोणताही असला तरी 'समाजशिक्षण' करायचे हे धर्मकार्य त्यांनी स्वीकारले होते. असंख्य व्याख्यांनातून 'केसरी' 'मराठा' या वर्तमानपत्रांच्या माध्यमातून त्यांनी त्यांचे विचार लोकांपर्यंत पोहोचविले. एकदा अमरावतीला 'जुनी साम्राज्ये आणि नवी साम्राज्ये' या विषयांवर त्यांचे व्याख्यान होते. सभेला प्रचंड गर्दी जमली होती. सभेनंतर मुक्कामाच्या ठिकाणी भोजन आटोपून टिळक सुपारी कातरत खुर्चीवर बसले असताना एक तरुण शिक्षक त्यांना भेटावयास आला. त्याने आपले नाव न सांगताच टिळकांना वंदन करून आपल्याला राष्ट्रकार्य करण्याची इच्छा असल्याचे सांगितले. ''मी इथल्या सरकारी शाळेत शिक्षक असल्यामुळे दिवसा उघडपणे भेटण्याऐवजी रात्री गुपचूप भेटण्यास आलो.'' असेही त्या शिक्षकाने प्रांजळपणे सांगितले.



''स्वदेशसेवा करण्याची केवळ तळमळ असून चालत नाही. तुम्ही आत्तापर्यंत देशसेवेचे एकही काम शोधून काढू शकला नाहीत?'' असा उलट प्रश्न टिळकांनी त्या शिक्षकाला विचारला. त्यांच्या शब्दातून तीव्र संताप व्यक्त होत होता. पुढे शांतपणे टिळक म्हणाले,

''अशी अवस्था केवळ तुमचीच नाही की तुम्ही दोषीही नाही. तुम्हा तरुणांना ज्या प्रकारचं शिक्षण मिळालं आहे त्याचाच मुख्यत: हा परिणाम आहे. ह्या सरकारी शिक्षणानं आमचा घात केला आहे. तैमूरलंगाच्या टोळधाडीनं देखील

आला पहिला पाऊस, शिंपडली भुई सारी धरित्रीचा परिमय, माझं मन गेलं भारी

आमचं इतकं नुकसान केलं नसेल. वर्षानुवर्षे शाळा-कॉलेजात जाऊन आणि ग्रंथांचे ढीगच्या ढीग उलथेपालथे करून आजचे तरुण पुन्हा कोरडे ते कोरडेच. देशाच्या विपन्नावस्थेकडे मुळी त्यांचं लक्षच जायचं नाही. गेलंच तर त्या अवस्थेचं धड आकलन करता येत नाही. आकलन झालं तर उपाय काय योजावे ते सुचत नाही. समजा एखादा उपाय सुचला तर तो अमलात आणायची हिंमत होत नाही आणि चुकूनमाकून एखाद्याला तशी हिंमत झालीच तर त्याला हाती घेतलेलं काम नीट तडीला नेता येत नाही. शिक्षणानं आमच्या तरुणांना जर काही प्राप्त होत असेल तरी ती ही! यावर उपाय एकच! आताची सरकारी शिक्षण पद्धती मुळापासून उखडून टाकून त्याऐवजी आपण तरुण पिढीला राष्ट्रीय शिक्षण दिलं पाहिजे.''

पुढे टिळकांनी त्या तरुणाला प्रश्न विचारला, ''देशासाठी तुमचं अंत:करण जळतं आहे ना?''

''याचे उत्तर 'हो' असेल तर मग तुम्हाला लिहिता आलंच पाहिजे. तुम्ही करत असलेल्या कोणत्याही कामातून, मग शिक्षण देण्यातून अथवा घेण्यातून देशकार्याच्या हिताचा विचार केला गेला पाहिजे. या तळमळीतून शब्द आणि कार्य जन्माला येतं. केवळ शब्दांपासून तळमळ निर्माण होत नाही. तुमच्या अंत:करणात स्वदेशाविषयी जर खरोखरच तळमळ असेल तर देशकार्य करायचा मार्ग तुम्हाला स्वत:लाच आज ना उद्या सापडेल. पण त्यासाठी जरूरी आहे, राष्ट्रीय शिक्षणाची आणि मनाच्या तळमळीची!''

लोकमान्य टिळकांच्या विचारांची साक्ष आजही पटते. लोकमान्यांच्या पुण्यस्मरणानिमित्त विनम्र अभिवादन!!

## शब्दांची दुनिया

दीर्घ काळ परकीय राजवटीमुळे विविध भाषांचे शब्द मराठीत रुळले आहेत. त्यापैकी काही शब्द येथे दिले आहेत. तुम्हीही आणखी शब्द शोधा. इस्लामी राजवटीमुळे मराठीत आलेले काही शब्द.

**अरबी शब्द –** अक्कल, किंमत, करार, कर्ज, जाहीर, जादा, तुफान, दफ्तर, ताईत, नक्कल, हिंमत, हिशेब, अगर, बाग

**इंग्रजी शब्द –** मास्तर, बोर्ड, स्टेशन, फी, पेन, पेन्सिल, कंपास, कोट, पँट, पाकीट, नर्स, डॉक्टर, क्रिकेट, बॉल, टेनिस, स्वेटर.

**पोर्तुगीज शब्द –** घमेले, पगार, काजू, कंपू, फालतू, टिकाव, अननस, बिस्किट, चावी, कोबी, पेरू पोपई, हापूस, भोपळा, खमीस.

**फ्रेंच शब्द –** फिरंगी, काडतूस, कूपन.

आता उगू देरे शेतं, आला पाऊस पाऊस। बऱ्हे येऊ देरे रोपं, आता फिटली हाऊस।।

# जगप्रसिध्द स्त्री रत्ने

**भाग १ व २ .....** **मीरा क्षीरसागर**

वाचलेच पाहिजे असे काही

*परदेशात जन्माला येऊनही भारतीयांकरिता ज्यांनी आपले सर्व आयुष्य वेचले अशा व्यक्तींमध्ये भगिनी निवेदितांचे नाव घ्यावे लागेल. स्वामी विवेकानंदांच्या विचारांनी प्रभावित होऊन त्या भारतात आल्या. भारतीय जीवन व संस्कृतीशी इतक्या एकरूप झाल्या की उर्वरित आयुष्य त्यांनी भारतीयांच्या उद्धाराकरिताच वेचले.*

*साहित्यामध्ये नोबेल पुरस्कार मिळविणारी पर्ल बक ही अमेरिकेतील पहिली लेखिका होय. ''द गुड अर्थ'' या त्यांच्या कादंबरीमुळे लेखिका म्हणून त्यांना जगभर मान्यता मिळाली. साहित्याबरोबर त्यांनी समाजसेवा व अपंग मुलांच्या कल्याणाकरिता आपले आयुष्य वाहून घेतले होते.*

*भारत देश व हिंदू धर्म याबद्दल अपार प्रेम व आपुलकी असणाऱ्या डॉ. ॲनी बेझंट यांनी भारताच्या स्वातंत्र्याकरिता बहुमोल कष्ट घेतले, प्रसंगी कारावासही भोगला. भारतीयांना स्वाभिमान शिकवून अन्यायाचा प्रतिकार करण्यास प्रवृत्त केले. यामुळेच भारताच्या इतिहासात त्यांचे नाव अजरामर झाले.*




*लहानपणापासूनच हुशार असलेली मेरी, उच्च शिक्षणाचा ध्यास घेऊन पॅरिसला गेली. अतिशय परिश्रमपूर्वक संशोधन करून, रेडियमचा शोध लावून मेरी क्युरीने मानवजातीवर फार मोठे उपकारच केले आहेत.*

*शारदादेवींचा रामकृष्णांशी बालपणीच विवाह झालेला होता. रामकृष्णांनी कालीमातेची उपासना करण्याकरिता आपले आयुष्य वाहून घेतले होते व शारदादेवींनीही पतीच्या अध्यात्मसाधनेत कसलाही अडथळा न*

टपकत्या पागोळ्यांचा अंगणात पडे सडा, करी चिमण्या वनात चिवचिवाट ओरडा।

*आणता त्यांचे कार्य समर्थपणे पुढे चालविले.*

*जगातले ८ वे आश्चर्य म्हणून जिचा गौरव केला जातो ती अमेरिकेची सुप्रसिद्ध परंतु अंध, बहिरी व मुकी लेखिका – हेलन केलर म्हणजे खरोखर मानवी चमत्कारच होय. दैवाने तिला अनेक गोष्टी नाकारल्या होत्या. परंतु आपल्या अपंगत्वावर मात करून तिने केवळ स्वत:चा उत्कर्षच साधला नाही तर इतर अपंगांकरिता अद्वितीय कामगिरी केली आहे. या हेलन केलरचा परिचयही या ग्रंथात आहे.*

*देशादेशांतील भांडणे थांबवून युद्धविराम व्हावा व जगात शांतता नांदावी यासाठी अपार कष्ट सोसून तळमळीचे प्रयत्न केल्यामुळे 'बर्था वान सटनर' यांना विश्वशांतीसाठी असलेले नोबेल पारितोषिक मिळाले. त्यांची 'डि वाफेन नीडर' म्हणजे 'शस्त्रे खाली ठेवा' ही कादंबरी अतिशय गाजली व त्यांच्या शांतता चळवळीला स्फूर्ती देणारी ठरली. सध्याच्या अस्थिर वातावरणात शांततेसाठी प्रयत्न करणाऱ्या लोकांना त्यांचे कार्य दीपस्तंभाप्रमाणे मार्गदर्शक ठरेल.*

*भारताची गानकोकिळा, स्वरसम्राज्ञी अर्थात लता मंगेशकर यांनी बालपणापासून अत्यंत प्रतिकूल परिस्थितीशी झुंज देत, मोठ्या धैर्याने व जिद्दीने यश, मानसन्मान व कीर्ती मिळविली. या गानकोकिळेचा जीवनपट या पुस्तकात आहे.*

*डॉ. आनंदीबाई जोशी ही एक कर्तृत्ववान, धाडसी व असामान्य बुद्धी असलेली स्त्री होय. तत्कालीन समाजाला स्त्रीने शिक्षण घेणेच जिथे मान्य नव्हते तिथे गोपाळरावांनी आनंदीबाईंना डॉक्टर करावयाचे स्वप्न पाहिले व तल्लख बुद्धीच्या आनंदीबाईंनीही अत्यंत प्रतिकूल परिस्थितीला तोंड देत आपल्या पतीची ही महत्त्वाकांक्षा पूर्ण केली.*

*या स्त्री रत्नांनी जिद्दीने, अथक परिश्रमांच्या बळावर अनेक संकटांशी झुंज देत, आपापल्या क्षेत्रात महनीय अशी कामगिरी केली आहे. या कामगिरीचा उल्लेख व तिचे प्रेरणादायी वर्णन या पुस्तकामध्ये केले आहे. त्यांच्या वाचनातून आपण नक्कीच प्रेरणा व स्फूर्ती मिळेल.*

***जगप्रसिद्ध स्त्री रत्ने भाग १ व २***
***लेखिका** – सरिता वैद्य **मूल्य** – रु. २०/-*
***प्रकाशन** – सुरेश एजन्सीज*

# माझा राष्ट्रध्वज, माझा अभिमान

कथा

**दत्ता टोळ**

कुमार मित्रांनो,

तुम्हाला खरोखरी घडलेली गोष्ट सांगायची आहे. गोष्ट पुण्यातील. ह्या कथेचा नायक एक नाही, अनेक आहेत अनेक. तुमच्यासारखेच. अगदी तुमच्यापैकी प्रत्येकासारखे. त्यामुळे त्यांची नावे तुमच्यापैकी प्रत्येकाची असतील.

कथेची पार्श्वभूमी थोडी सांगायला पाहिजे. त्यासाठी आपल्याला काही वर्षे मागे जायला लागेल. त्या वेळी नुकतीच एक भीषण दुर्घटना घडली होती.



भारताचे सरसेनापती जनरल अरुणकुमार वैद्य यांची पुण्यात अतिरेक्यांनी हत्या केली होती. मन गोठून जावे अशी ती घटना. अत्यंत निर्घृणपणे मारेकऱ्यांनी नि:शस्त्र अरुणकुमार यांच्यावर बेछूटपणे गोळ्या चालवल्या होत्या. जनरल वैद्य मरण पावले याची खात्री झाल्यानंतरच मारेकऱ्यांची बंदूक शांत झाली होती. मारेकरी शीख अतिरेक्यांना पकडण्यात आले. परंतु अरुणकुमार वैद्य यांचे प्राण उडून गेले होते. त्या घटनेने सारे पुणेच नव्हे तर सारा देश सुन्न झाला होता.

काही दिवसांनंतरची हकिकत. कॅम्पात गोळीबार मैदानाच्या पुढे एक शाळा आहे. त्या शाळेत घडलेली कथा. ऑगस्ट महिन्याची दहा तारीख. मुख्याध्यापक नेहमीप्रमाणे त्या दिवशी आलेले टपाल पाहात होते. त्या टपालात एक सरकारी लिफाफा होता. त्यात काय फतवा आहे हे पाहण्यासाठी मुख्याध्यापकांनी ते पाकीट सर्वप्रथम फोडले. अन् लिफाफ्यातून कागद काढून ते वाचू लागले. कागदावरील चक्रिमुद्रित अक्षरांवरून जशी त्यांची

नजर फिरू लागली तस तसे ते अधिकाधिक क्रोधायमान होऊ लागले. डोळे विस्फारलेले. रागामुळे नाकपुड्या थोड्या फुगलेल्या, रागाची जागा आता क्रोधाने घेतलेली. अशा अवस्थेत त्यांनी टेबलवरील घंटा अंमळ जोरात वाजवली. घंटा ऐकून शाळेचा शिपाई आत आला. सरांनी सांगितले, ‘‘सर्व शिक्षकवर्गास बोलाव.’’ ‘‘जी ऽऽ’’ म्हणत तो शिपाई निघून गेला. सरांच्या केबिनमध्ये एक एक करीत सर्वजण आले. आजच्या तातडीच्या बैठकीचं कारण कोणालाच माहीत नव्हतं. सर बोलू लागले, ‘‘पुण्यातील दुर्घटनेची सर्वांना माहिती असेलच.’’ सर्वांनी होकारार्थी मानेने संकेत केला. तेव्हा त्या सर्वांना उद्देशून ते पुढे बोलू लागले, ‘‘तळपायाची आग मस्तकाला जावी अशी घटना घडत आहे.’’

‘‘कोणती?’’ सर्वांनी एका सुरात प्रश्न केला. तेव्हा मुख्याध्यापक ते सरकारी परिपत्रक संक्षेपाने वाचू लागले, ‘‘शासनाला एक निनावी पत्र आलंय. त्यात पत्रलेखकाने १५ ऑगस्टच्या ध्वजवंदन कार्यक्रमाचे वेळी पुण्यातील एक शाळा बॉम्बने उडवून दिली जाईल अशी धमकी दिली आहे.’’

‘‘हत् तिच्या एवढंच !’’ असं म्हणत शाळेचा लेखनिक बोलू लागला, ‘‘अशा धमक्या नेहमीच येत असतात.’’

त्यावर मुख्याध्यापक म्हणाले,




फुलव पिसारा मोरा, श्रावण येतो आहे. उंच स्वराने वारा स्वागत गीत गातो आहे.

''आपण सर्वांनी निर्णय घ्यावा. पण अडचण अशी आहे की, शाळा कोणती ते पत्रात लिहिलेले नाही.''

''काय करावं बरे!'' मुख्याध्यापक स्वत:शीच पुटपुटले.

तेव्हा सहकारी शिक्षक म्हणाले,

''आपण पालकांचंही मनोगत जाणून घेऊ या.''

''हो ऽऽ हो ऽऽ'' म्हणत सर्वांनी सूचनेस संमती दर्शविली.

''सूचना योग्यच आहे. पण त्या अगोदर तुमचं म्हणणं जाणून घ्यायचं आहे.'' मुख्याध्यापक.

''यंदा १५ ऑगस्ट साजराच नाही केला तर?'' अति काळजी करणारे एक शिक्षक बोलले. त्यांचे ते भित्रेपणाचे उद्‌गार ऐकून मनात खट्टू झालेले मुख्याध्यापक म्हणाले, ''आपल्या शाळेत मुलांना आदर्शाच्या गोष्टी आपण सांगतो. तेव्हा तुमच्या सूचनेनुसार १५ ऑगस्ट साजराच न केला तर मुलांना काय वाटेल?''

''सर, मुलांची सुरक्षितता महत्त्वाची.''

''बरोबर आहे हे तुमचं. क्रांती लढ्यात ज्यांनी समर्पण केलं, छोडो भारत आंदोलनात सहभागी होऊन जे धारातीर्थी पडले, 'वंदे मातरम्!' हा मंत्र मानून जे सदैव उच्च आवाजात वंदे मातरम् म्हणत देह पडला तरी हातातील तिरंगा ज्यांनी सोडला नाही त्यांचं काय? आपल्याला स्वातंत्र्य मिळावं म्हणून जे लढले त्यांच्या बलिदानाचं काय?''

कोणीही उत्तर दिलं नाही. अधिक भाष्य न करता मुख्याध्यापकांनी दुसरे दिवशी पालक – बैठक बोलावण्याची तजवीज करण्याबद्दल सूचना केली, अन् ते निघून गेले. ती रात्र अनेकांना जागून काढावी लागली. कारण तसंच सर्क्युलर सर्व शाळांतून गेले होते.

दुसरा दिवस. वेळ दुपारची. सूर्य माथ्यावर आलेला. अन् हायस्कूलच्या एका हॉलमध्ये पालक – बैठक सुरू झाली. मुख्याध्यापकांनी पालकांना परिस्थितीची कल्पना दिली अन् सूचना करण्यास सांगितले.

मुख्याध्यापकांचे बोलणे ऐकून सर्वच पालक मनातून अस्वस्थ झाले होते. थोड्या वेळाने येतो असे म्हणत मुख्याध्यापक हॉलबाहेर पडले. दोन पाच मिनिटे हॉलमध्ये कमालीची शांतता पसरली. कुणी काय बोलावे? हेच सर्वांना कळेनासे झाले होते. शेवटी मनाचा ठिय्या करून एकजण बोलले, ''परिस्थिती फारच गंभीर अन् चमत्कारिक वाटते. आपल्याला आपला पाल्य सुखरूप राहायला हवा. त्यासाठी वाटेल ती किंमत भोगायला मी तयार आहे.''

''आम्हालाही तसंच वाटतं.'' दोघे–

थेंब कशाचे? जलवर्षाव, तृप्तीमाजी बुडेल गाव।

तिघे एकदमच म्हणाले. ''निरपराध पोरांचा बळी घेण्यात ह्या अतिरेक्यांना काय गंमत वाटते कुणास ठाऊक?''

''राक्षस, नराधम आहेत झालं.''

''अहो, इथं मूल मारायचं, का घोडं! हा प्रश्न नाही. प्रश्न आहे प्रतिष्ठेचा. प्रश्न आहे तो सूडाचा. म्हणून तर..'' त्याला मध्ये थांबवीत एक गृहस्थ ओरडले, ''सूड ! म्हणे सूड ! अशाने का प्रश्न सुटणार आहे?'' ''प्रश्न सुटो अथवा न सुटो. त्यांना समाधान तर मिळेल!''

''पण हे ज्यासाठी आहे ते त्यांना कसं साध्य होईल.''

''हे त्यांना समजावून कोण सांगणार?''

''मी सांगेन.'' एकजण निर्धारपूर्वक उद्गारला.

''ते कसं शक्य आहे? तुम्हांला सगळे अतिरेकी थोडेच भेटणार आहेत?'' दुसऱ्याने परस्पर खुलासा केला. त्यावर काही बोलण्यासाठी पहिला उभा राहणार तोच सूटबूट टाय अशा वेषातले एक गृहस्थ बोलले, ''यंदा स्वातंत्र्यदिन साजरा करू नये अशी सूचना करू.'' तेवढ्यात मुख्याध्यापक हॉलमध्ये आले. तेव्हा ते मुख्याध्यापकांना म्हणाले, ''यंदा १५ ऑगस्ट करायला नको. हवं तर १४ ऑगस्टला शाळा सुटताना झेंडावंदन घ्या.''

असेच काही ना काही उपाय पालक सुचवीत होते. त्या सर्व चर्चेचा रोख पलायनवादी होता. पक्का अन् चांगला निर्णय होत नव्हता. तेव्हा काहीही निर्णय न देता अस्वस्थ झालेल्या मुख्याध्यापकांनी बैठक संपल्याचे सांगितले. पालक निघून गेल्यानंतर मुख्याध्यापक बोलले, ''मला असं वाटतं उद्या प्रार्थना झाल्यानंतर विद्यार्थ्यांचे मनोगत जाणून घेऊ या.''

दुसरा दिवस शाळेच्या मैदानावर हजारो मुले जमली. धीरगंभीर आवाजात सर्वांनी प्रार्थना म्हटली. मुख्याध्यापक माईकसमोर आले. मुलांनी टाळ्यांच्या कडकडाटात त्यांचे स्वागत केले. मुख्याध्यापक बोलू लागले, ''विद्यार्थी मित्रांनो, आपल्या शाळेची नवीन इमारत कशी उभारली, हे तुम्हाला ठाऊक असेलच! सिमेंटची टंचाई होती. काळ्या बाजारात थोडे जास्त पैसे देऊन इमारत बांधायची नाही हा माझा निर्धार तुमच्या प्रत्येकाच्या घरून माझ्या 'ओम् भवती भिक्षां देही' ला एका विटेची रक्कम मिळाली. अन् नवीन इमारत उभारली. काळा बाजार करू नये हा सुसंस्कार येथील विटेच्या मनावर कोरत गेला आहे. पाठ्यपुस्तकात तुम्ही शिरीषकुमार, बाबू गेनू यांच्या गोष्टी वाचल्या आहेत. झाशीची राणी,

सुभाषचंद्र बोस, स्वातंत्र्यवीर सावरकरांचे चरित्र तुम्ही वाचले असणार. तेव्हा यंदा १५ ऑगस्टबद्दल काय करू या?'' म्हणत मुख्याध्यापकांनी मुलांना निनावी पत्राची माहिती दिली अन् विचारले, ''तुम्हीच सांगा काय करायचं ते?''

विद्यार्थ्यांमध्ये चर्चा सुरू झाली.

''बंड्या, काय करायचं रे?''

''मला काय विचारतोस? तुझं तू ठरव अन् सांग.''

''अरे तू मॉनिटर ना, म्हणून तुला विचारलं.''

''मी सांगेन ते ऐकणार का तुम्ही?''

''काय ते सांग. मग ठरवू.''

''तेच नको आहे मला. माझ्यावर पूर्ण विश्वास ठेवा. वर्गाचा लिडर मानता ना मला?'' त्यावर सर्वांनी माना डोलावल्या. तेव्हा मॉनिटर बोलला, ''अरे, मी तुम्हाला भलतं सलतं कसं सांगेन? मी तुमच्यापैकीच एक आहे. तुम्हाला बदसल्ला कसा देईन? शिवाय असं पाहा, प्रार्थनेच्या वेळी आपले सर, मुख्याध्यापक असणारच. दगाफटका होईलच कसा? अन् समजा झालाच तर शाळेसह आपण सगळे जमिनीत गाडले जाऊ. तेव्हा.....''

मॉनिटरला अर्ध्यावर तोडीत एकजण म्हणाला, ''ए बाबा, हे असलं, भलतंसलतं काही बोलू नको. माणसानं चांगलं बोलावं. तेव्हा असं काही



होणारच नाही असं ठामपणे बोल.''

''अनेकांप्रमाणे माझी देखील तशीच इच्छा आहे. परंतु दुर्दैवाने नेमकं तसं घडलंच तर....! यासाठीच तर आपलं हे विचारमंथन चालू आहे.''

''चांगल्या गोष्टीला उशीर नसावा. काय घडेल ते सांगता येत नाही. पटकन् निर्णय घेऊ या. निर्णय असा असावा की आपल्या पालकांना, शिक्षकांना आपल्याबद्दल अभिमान वाटावा. शेळी होऊन शंभर वर्षे जगण्यापेक्षा वाघ-सिंह बनून चार-पाच वर्षे निभावली तरी चालेल. पण गौरवास्पद निर्णय घ्या.''- मुख्याध्यापक. त्यावर सगळेच ओरडले,

''१५ ऑगस्ट त्याच दिवशी मैदानावर साजरा करायला सांगू.'' मुलांनी एकमुखाने तो निर्णय सांगितला. ते ऐकून सरांची छाती अभिमानाने फुलून आली. मुलांच्या शौर्यगाथा लिहिल्याचे सार्थक झाले असे त्यांना वाटले. त्यांनी दोन फोन केले. खबरदारी घ्यायची म्हणून ते फोन होते. ते फोन होते पोलिस

कमिशनर व कॅन्टोन्मेंट बोर्डाच्या लष्करी अधिकाऱ्याला.

पंधरा ऑगस्टची सकाळ. पूर्ण गणवेशातील ती मुले 'आज' लष्करी पोषाख धारण केलेली वाटत होती. यंदा अधिकच ऐटीत पावले टाकीत वर्गातली मुले मैदानावर जमली. मुलांचे पालक मैदानाभोवतालच्या भिंतीजवळ उभे राहून विद्यार्थ्यांचे संचलन पाहात होते. जणू त्यांनी शाळेभोवती मानवी तटबंदी उभी केली होती. बिगुलाच्या आवाजात, बॅण्डच्या तालावर 'जन गण मन' राष्ट्रगीत झाले.




नभ भेदून जाईल अशा उच्च स्वरात मुले 'जय हिंद, जय भारत' म्हणाली. आपापल्या पाल्याला बरोबर घेऊन पालक गेले. कार्यालयात शिक्षक जमले होते. कुणी मुख्याध्यापकांच्या निर्णयाबद्दल अभिनंदन करीत होते. तर कुणी त्यांच्या निर्णयाचं कौतुक करीत होते.

शाळेची वेळ संपली. सर्वजण घरोघर गेले. शाळेच्या आवारातीलच घरात एका खोलीत मुख्याध्यापक आरामखुर्चीवर पहुडले होते. चेहऱ्यावर कृतकृत्यतेचे समाधान होते. राष्ट्रप्रेमी योद्ध्याचे तेज चेहऱ्यावर होते. माँटेसरी शाळा सुटली. बालकांचा किलबिलाट सुरू झाला. बालके हातात तिरंगा झेंडा असलेले भिरभिरे घेऊन जात होती. चष्म्याच्या फ्रेमच्या आतून डोळ्यांतील आनंदाश्रू पुसत मोठ्या समाधानाने दोन डोळे राष्ट्रध्वज पाहात राहिले.

(श्री. सुधाकर प्रभू मुख्याध्यापक असताना काही वर्षांपूर्वी घडलेली ही खरी कथा आहे.)

# गॅझेटीयर्स (दर्शनिका) माहितीचा खजिना

डोळस भटकंती-१

प्र. के. घाणेकर

आपल्यापैकी बहुतेकांना हिंडा-फिरायला आवडतं. प्रवासाची नावड असणारी माणसं शोधायलाच लागतील. काहीजणांना पायी प्रवास करणं आवडेल तर काहीजण सायकलवर स्वार होऊन बाहेर पडतील. कोणी बसनं तर कोणी स्वत:च्या मोटरनं प्रवासाला जाणं पसंत करतील. रेल्वे-बोट-विमान यांच्या मदतीनंही पर्यटन साधणं काही वेळा अनिवार्य ठरतं. प्रवास कसाही केला; तरीही ज्या प्रदेशात आपण पाऊल ठेवतो, तिथला इतिहास-भूगोल-निसर्ग-लोकजीवन-परंपरा अशा अनेक गोष्टी कळत न कळत आपल्या मनावर ठसतात. कदाचित प्रवासात मिळणारं हे सारं ज्ञान सर्वांनी स्वत: हिंडून, आपल्या डोळ्यांनी पाहून त्याचा अनुभव घ्यावा म्हणूनच आपल्या शहाण्या-विचारी पूर्वजांनी यात्रा-तीर्थयात्रा-जत्रा यांची गुंफण करून ठेवली असावी. अलीकडे शाळांमधून सहलींना उत्तेजन दिलं जातं.

सर्वांनाच काही गिर्यारोहण करीत डोंगराकडे चढणं शक्य नसतं आणि दरवेळी काश्मीर, म्हैसूर-बंगलोर-उटी-सिक्कीम-दार्जिलिंग, नाहीतर रम्य हिमालयातील सिमला-कुलू-मनाली अशा दूरदूरच्या महागड्या ठिकाणी जाणं खिशालाही परवडणारं नसतं.

दिवाळीची अन् उन्हाळ्याची सुट्टी किंवा जोडून आलेली सुट्टी म्हणजे प्रवासाची पर्वणीच. अशा वेळी कुठेही जायचं ठरवलं, तरी त्या ठिकाणाची नेमकी माहिती पटकन् मिळणं अवघड असतं. एखादा किल्ला किंवा लेणं नाहीतर निसर्ग-'नवल-स्थान निवडावं तर त्याची अपुरी माहिती मिळूनही काहीच फायदा नसतो. दरवेळी आपण निवडलेल्या ठिकाणी जाऊन आलेला माणूस आपल्याला भेटेलच असंही नाही. अशा वेळी नेमकं काय करावं असा प्रश्न सर्वांनाच पडतो. त्या त्या जिल्ह्याचं गॅझेटीयर मिळवता आलं तर मात्र हे प्रश्न चुटकीसरशी सुटतात.

गॅझेटीयर्स म्हणजे ज्ञानाचा, माहितीचा आटोपशीर खजिनाच. यालाच मराठीत दर्शनिका असा शब्द आहे. पण दुर्दैवाने त्यांचा परिचयच बहुतेकांना नसतो.

पाना फुलांची नक्षी वाचतात प्राणी पक्षी। इंद्रधनु असे साक्षी, माणसाचे चित्त लक्षी।।

**निर्मितीची कथा**

सातासमुद्रापलीकडून आलेल्या इंग्लिशांनी तराजू अन् तलवार बाळगून मोठ्या धूर्तपणे हिंदुस्थानसारख्या खंडप्राय देशाचा ताबा घेतला. भिन्न – धर्म – जाती – रूढी –परंपरा असणारा हा विशाल प्रदेश भौगोलिक – राजकीय – आर्थिक आणि सांस्कृतिकदृष्ट्या विविधतेने समृद्ध होता. तर या भूभागाची तपशीलवार माहिती असणं अत्यावश्यक होतं. ही माहिती अचूक असणंही महत्त्वाचं होतं.

स्वत:च्या देशातील चुणचुणीत धाडसी–कल्पक अन् ठोस निर्णय घेऊन ते राबविणाऱ्या तरुणांची निवड करायची. त्यांना थोडंफार प्रशिक्षण द्यायचं आणि आपल्या ताब्यात असणाऱ्या प्रदेशात त्यांना राज्यकर्ते–शासनकर्ते म्हणून पाठवायचं. ज्या प्रदेशात त्यांची नेमणूक करायची त्या प्रदेशाची माहिती तिथे जाण्यापूर्वीच त्यांना उपलब्ध करायला हवी. म्हणजे त्या प्रदेशात पाऊल ठेवण्याआधीच त्यांची वैचारिक बैठक तयार झालेली असते. अधिक चांगल्या तऱ्हेने अंमल गाजविण्यास त्याची निश्चित मदत होईल. अशा कल्पनेतूनच गॅझेटीयर्सची निर्मिती राज्यकर्त्या इंग्लिश धुरीणांनी केली. ही कल्पना प्रमाणाबाहेर यशस्वीही ठरली.

इंग्लिश राज्यकर्त्यांनी स्वत:च्या सोयीनुसार ताब्यात आलेल्या प्रदेशाचे इलाखे – जिल्हे – तालुके असे भाग पाडले. जिल्हा हा सुटसुटीत घटक धरून जिल्हावार गोळा केलेली माहिती विशिष्ट पद्धतीने या डिस्ट्रिक्ट गॅझेटीयर्समध्ये दिलेली आहे. त्यांच्या थेट ताब्यातील बहुतेक सर्व जिल्ह्यांचे हे माहितीकोश त्यांनी छापून प्रसिद्ध केले. ब्रिटिश इंडियात समाविष्ट नसलेल्या संस्थानी मुलुखातील काही प्रदेशांची याच धर्तीवर असणारी गॅझेटीयर्स त्या त्या संस्थानिकांनी प्रकाशित करण्याचाही प्रयत्न पुढे झालेला दिसतो.

पश्चिम हिंदुस्थानातील अशा जिल्हावार गॅझेटीयर्सच्या निर्मितीची जबाबदारी जेम्स एम्. कॅम्पबेल या आय्. सी. एस. दर्जाच्या अधिकाऱ्याकडे देण्यात आली. सुमारे शे–सव्वाशे वर्षांपूर्वी निर्मिलेली ही गॅझेटीयर्स आजही तितकीच उपयुक्त ठरतात.

''गॅझेटीयर्स'' आणि ''गॅझेट'' यामधील फरक याच ठिकाणी समजावून घ्यायला हवा. ''गॅझेटीयर्स'' म्हणजे विशिष्ट विषय किंवा प्रदेश ध्यानी घेऊन संकलित केलेल्या माहितीचे पुस्तक. त्याला आपण ''माहितीकोश'' म्हणू शकतो. तर सरकारी पातळीवर घडणाऱ्या महत्त्वाच्या गोष्टींची प्रसिद्धी करणारं ते ''गॅझेट'' किंवा ''राजपत्र''. यावरून उच्चदर्जाचे अधिकारी गॅझेटेड ऑफिसर्स

किंवा राजपत्रित अधिकारी म्हणून ओळखले जाऊ लागले. कारण त्यांच्या नेमणुकीच्या अधिकृत घोषणा अशा गॅझेटमध्ये प्रसिद्ध केल्या जातात.

जिल्हावार गॅझेटीयर्सप्रमाणेच भारतीय इतिहास, हिंदुस्थानात सापडणाऱ्या वनस्पतींच्या उपयोगांनुसार वर्गीकरण करून त्यांची संकलित माहिती यांचीही अनेक खंडांमधील गॅझेटीयर्स इंग्लिशांनी पुढाकार घेऊन तयार केली होती. स्वातंत्र्य मिळाल्यावर झालेल्या राज्य आणि जिल्हा पुनर्रचनेमुळे अशा गॅझेटीयर्सच्या सुधारून वाढविलेल्या आवृत्त्यांची गरज निर्माण झाली.

अशा सुधारित गॅझेटीयर्स बरोबरच जुन्या माहिती कोशांचीही गरज होतीच. आता तर या गॅझेटीयर्सची स्थानिक भाषांमधील भाषांतरेही उपलब्ध करण्यात आली आहेत.

या सर्वच अती उपयुक्त सरकारी प्रकाशनांच्या किंमती सर्वसामान्यांच्या आवाक्यात राहतील याचीही दक्षता घेतली जाते. पुण्यातील जी.पी.ओ. म्हणजे मुख्य पोस्ट ऑफिसजवळील फोटोझिंको प्रेस शेजारी असणाऱ्या शासकीय लेखा सामग्री विक्री भांडारात तसेच मुंबईमधील तारापोरवाला मत्स्यालयाशेजारच्या मुख्य विक्री भांडारात ही गॅझेटीयर्स विकत मिळू शकतात.

सर्वसाधारणपणे सर्वच जिल्हा गॅझेटीयर्सची मांडणी एकाच नमुन्याची असते. चौदा प्रकरणांमध्ये विभागलेल्या या माहितीकोशातील पहिले प्रकरण त्या त्या जिल्ह्याचे स्थान–क्षेत्रफळ–समाविष्ट प्रदेश व सरहद्दी – डोंगरपर्यंत – नद्या – तळी – जलाशय, भूशास्त्रीय माहिती – हवामान – पर्जन्यमान – तापमान यांची माहिती देते तर दुसरे प्रकरण त्या जिल्ह्यातील खनिजे – जंगले – पाळीव प्राणी, वन्य प्राणी (साप, मासे, पक्षी इ.) यांची माहिती देते. चौथ्या प्रकरणात शेती व आनुषंगिक माहिती दिलेली असते. सहाव्या प्रकरणात वाहतूक व दळणवळण तर सातव्या प्रकरणात त्या जिल्ह्याच्या इतिहासाची थोडक्यात ओळख करून दिलेली असते. प्रवाशांना या प्रकरणातील माहितीचा खूप उपयोग होतो. चौदावे प्रकरण ''प्लेसेस ऑफ इंटरेस्ट'' असे असते. त्याचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. त्या जिल्ह्यात असणाऱ्या गावे, लेणी, किल्ले, मंदिरे, निसर्ग नवलस्थाने, जलाशय आदींची अचूक अन् थोडक्यात पण महत्त्वाची माहिती दिलेली असते. हिंडू–फिरू पाहणाऱ्यांना हे प्रकरण सर्वात उपयुक्त ठरते. या उपयुक्त माहितीला रंगीत नकाशा, परिशिष्टे, फोटो म्हणजे प्रकाशचित्रे आणि वर्णानुक्रमी सूची म्हणजे इंडेक्स याची जोड दिलेली असते.

धामधूम पावसाची पाहूनिया सारी, उन्हे आवरोनी गेले सूर्यदेव घरी।

कोणतीही माहिती सुलभतेनं मिळविण्यास त्यांचा उपयोग होतो.

**तुम्ही काय करू शकता?**

या जाडजूड पुस्तकांच्या आकाराला न भिता, ते ग्रंथ मिळवून त्यांचा संदर्भ म्हणून उपयोग करायला शिकलं पाहिजे. सरकारी अनुदानांमुळे त्यांच्या किंमतीही आटोक्यात असतात. किमान आपण ज्या जिल्ह्यात वास्तव्य करतो त्या जिल्ह्याचं इंग्लिश वा मराठी गॅझेटीयर मिळवून ते आपल्या ग्रंथसंग्रहात ठेवणं आणि ते वारंवार वापरणं हे आपल्याला नक्कीच जमू शकेल. आपण पूर्वी पाहिलेली ठिकाणं व तेथील निसर्ग यांच्या गॅझेटीयर्स मधील नोंदी आणि आपली निरीक्षणं ताडून पाहता येतील. आपल्या संकल्पित प्रवासापूर्वी ही माहिती वाचून टिपणं काढणं आणि तेथे जाऊन आल्यावर ते सारं आपल्या शब्दात लिहून काढणं हेही मनात आणलं तर अवघड होणार नाही. ज्ञानाच्या माहितीचे हे खजिने आपण मुक्त हस्ताने लुटले पाहिजेत.

## राष्ट्रीय बाल विज्ञान मेळाव्यासाठी स्पर्धा

*मुलांमध्ये जिज्ञासा, वैज्ञानिक दृष्टिकोन निर्माण होऊन त्यांना सामाजिक परिस्थिती, पर्यावरण यांचे प्रश्न समजावेत. त्या समस्यांवर उपाय शोधता यावेत. यासाठी १० ते १७ वयोगटातील मुलांसाठी राष्ट्रीय पातळीवर एक विज्ञान मेळावा आयोजित केला आहे.*

*एन. सी. एस. टी. सी. (नॅशनल कौन्सिल फॉर सायन्स अँड टेक्नॉलॉजी कम्युनिकेशन) या संस्थेमार्फत हा मेळावा घेण्यात येणार आहे. भारत सरकारच्या विज्ञान आणि तंत्रज्ञान विभागाअंतर्गत ही संस्था कार्य करते. डिसेंबर १९९५ मध्ये होणाऱ्या या मेळाव्यासाठी गतवर्षी प्रमाणेच यंदाही 'स्वच्छ करा भारत' हा विषय निवडला आहे. गेल्या वर्षीच्या राष्ट्रीय मेळाव्यात महाराष्ट्रने तीन पारितोषिके मिळविली होती.*

*यंदा डिसेंबर १९९५ मध्ये होणाऱ्या मेळाव्यापूर्वी १० ते १४ (लहानगट) आणि १४ ते १७ (मोठा गट) अशी दोन गटांत स्पर्धा घेण्यात येणार आहे. शालेय, जिल्हा, राज्य आणि राष्ट्रीय अशा स्तरांवर निबंध वाचन, भित्तिपत्रक (पोस्टर) स्पर्धा घेण्यात येणार आहे. शालेय स्तरावर ८-९ सप्टेंबरला राज्यस्तरावर २५-२६ नोव्हेंबरला आणि राष्ट्रीय पातळीवर २८ ते ३१ डिसेंबर दरम्यान दिल्ली येथे स्पर्धा घेण्यात येणार आहे.*

*बाल विज्ञान मेळावा आणि स्पर्धा यांच्या तपशीलासाठी इच्छुकांनी पुढील पत्त्यावर संपर्क साधावा.*

**पत्ता - युरेका सायन्स सेंटर**

१४७३, सदाशिव पेठ, स.प.महाविद्यालयासमोर, पुणे - ४११०३०.

# वनौषधी – घरगुती औषधांसाठी उपयुक्त

### आवळा

तुरट, आंबट, चवीचे आवळा हे फळ तुम्हाला चांगलेच माहीत असेल. पण हे एक औषधी आणि अत्यंत उपयुक्त फळ आहे. आवळ्याला हिंदीमध्ये अमलिका, गुजराथीत आमला किंवा अंबाल, कन्नड भाषेत अमलका, संस्कृतमध्ये आदिफळ आणि अम्लिका म्हणतात. इंग्रजीत याच फळाला एंब्लिक मायरोबलान तर लॅटिनमध्ये एंब्लिका ऑफिसिनॅलिस असे म्हणतात. या बहुगुणी फळाची आणखी माहिती या लेखात आपण करून घेणार आहोत.

आवळ्याची झाडे भारतात सर्वत्र आढळतात. याशिवाय श्रीलंका, चीन, मलाया येथेही आवळ्याची झाडे सापडतात. आपल्या महाराष्ट्रात कोकण, पश्चिम घाट, दख्खनचे पठार या भागात आवळ्याची झाडे मोठ्या संख्येने आहेत. आवळ्याचे खोड साधारण वाकडे – तिकडे असते. फांद्या पसरट मोठ्या असतात. झाडाची साले जाड, हिरवट – करडी असते. सालीच्या ढलप्या निघतात. त्यामुळे त्या जळणासाठी वापरल्या जातात. पाने एकाआड एक लहान देठांची असतात. साधारणत: मार्च ते मे या महिन्यांमध्ये पानांखालच्या फांदीच्या भागावर फुलांचे झुपके आवळ्याच्या झाडाला लागलेले दिसून येतात. ऑक्टोबर ते फेब्रुवारी या काळात फळे येतात आणि पिकतात. फळ साधारणत: गोल, दोन सेंटिमीटर व्यासाचे आणि गुळगुळीत, फिकट – हिरवट – पिवळे असते. फळात एकच त्रिधारी बी असते.

आवळ्याच्या वाळलेल्या फळांना 'आवळकाठी' असे म्हणतात. ही फळे अतिसार, रक्तस्राव, आमांश यावर गुणकारी असतात. तसेच कावीळ, रक्तक्षय, अग्निमांद्य या रोगांवरही लोहाबरोबर आवळा दिला जातो. हिरडा – बेहडा आणि आवळा मिळून बनवलेले 'त्रिफळा चूर्ण' हे अत्यंत उपयुक्त आहे. दमा, श्वसननलिकेचा दाह, पित्त यांच्या शमनार्थ आवळा खाल्ला जातो. आवळ्यापासून लोणचे, वडी, मोरावळा (मुरंबा), सुपारी आदी पदार्थ बनवतात.

आवळ्याच्या झाडाच्या सालीत, पानात आणि फळामध्ये भरपूर टॅनीन असते. त्यामुळे त्याचा उपयोग चामडी कमावण्यासही होतो. इमारतीच्या बांधकामात किरकोळ उपयोगासाठी आवळ्याचे लाकूड वापरतात. झाडाचा पाला, फळे जनावरे खातात. पानापासून तपकिरी–पिवळा रंगही काढला जातो.

'आवळा' हा हिंदू धर्मात पूजला जातो. आवळी भोजनही केले जाते. आवळ्याची शास्त्रीय माहिती येथे दिली आहे. इतर माहिती तुम्ही जमा करायची आहे. त्यामध्ये आवळ्यावर वात लावून दिवा का लावतात? आवळी भोजन का करतात? कधी करतात? 'आवळ्या' वरून वाक्प्रचार, म्हणीही रुळलेल्या आहेत. त्यांचा अर्थ काय? हे जाणून घेऊन आवळ्या विषयीच्या या माहितीत आणखी भर घालायची आहे.


ढगांची किमया पाऊस सरी धरतीवर येऊन चमत्कार करी।

भारत राष्ट्र उभारा

*उद्योगाची कास धरा, दैन्य सारे दूर करा।*
*शिस्तप्रेम अंगी भरा, भारत राष्ट्र उभारा।।*
*राष्ट्रसेवा हाच नारा, एकतेचा जोष भरा।। १ ।।*
*नव्या दिशा, नव्या आशा, विज्ञानाची वाट धरा।*
*प्रगतीचे सेतू बांधा, माना उंच अन् ताठ करा।। २ ।।*
*शिक्षणाचा ध्यास धरा, व्यसने हा शत्रू खरा।*
*आरोग्याची आस धरा, गाव स्वच्छ सारे करा।। ३ ।।*
*निरक्षर कोणी नसो, साक्षरतेची बात करा*
*ज्ञानाविना फोल माना, मंत्र जीवनी हा स्मरा।। ४ ।।*

***प्र. द. जोशी, परभणी.***



जलधारा

*बरसतील श्रावणातल्या जलधारा। धरणीला या भिजवायला*
*हिरवी होईल सृष्टी सारी। नवचैतन्याला उजळायला*
*आशा कुणाच्या फुलतील। निराशेला घालवायला*
*उगवेल नवा सूर्य। दारुण्य दुःख जाळायला*
*येईल सुंदर प्रकाश। सृष्टी सारी तेजवायला*
*बरसतील श्रावणातल्या जलधारा। धरणीला या भिजवायला।।*

**सुधीर सु.जाधव**
*इ.९ वी सिटी हायस्कूल, सांगली*

पाऊस म्हणजे हसणाऱ्या – डोलणाऱ्या पिकाचं आनंदी मुख।

# थर्मोकोल कटर


**जुई महाजन**, इ. ८ वी, ज्ञा. प्र. प्र. पुणे.

**ना**गपंचमी, रक्षाबंधन हे सण संपले की, वेध लागतात गणपती बाप्पाचे! गणपतीपुढे आरास काय करायची, कशी करायची याची चर्चा सारखी सुरू होते. आरास, सजावट यासाठी लागणारा महत्त्वाचा घटक म्हणजे थर्मोकोल. दुकानामध्ये थर्मोकोल मिळतो तो मोठा चौरस, आयत आकारात. आपल्याला चक्र करण्यासाठी किंवा रथ करण्यासाठी लागणारा आकार आपणच द्यावा लागतो. पण थर्मोकोल कापणे फारच त्रासाचे काम असते. एकसारख्या धारा येण्यासाठी

विज्ञान उपकरण

विजेवर चालणारा 'थर्माकोल कटर' तुम्हाला घरीच बनवता येईल.

**साहित्य –** ३० सें.मी.चा लाकडी चौरस, २५ सें.मी. लांब व ४ सें.मी. रुंद असलेली लाकडी फळी, ३५ सें.मी. लांबी व ४ सें.मी. रुंदीची आणखी एक लाकडी फळी, स्प्रिंग, ट्रान्सफॉर्मर, तांब्याची अतिशय पातळ तार, दोन स्क्रू, दोन विद्युत वायरी आणि प्लग.




करुणार्त हाकांनी ओथंबून ओघळते दयाघन आभाळ !

**कृती –** ३० सें.मी. च्या लाकडाच्या चौरसावर, २५ सें.मी.लांबी व ४ सें.मी. रुंदी असलेली फळी जोडा. जोडलेल्या फळीला वरून ४ सें.मी. ची खाच पाडा. खाचेत ३५ सें.मी. लांब व ४ सें.मी. रुंद असलेली फळी ३/४ भाग एकीकडे व १/४ भाग एकीकडे राहील अशी जोडा.

यानंतर ३५ सें.मी. लांब व ४ सें.मी. रुंद असलेल्या फळीच्या टोकावर आणि बरोबर खाली चौरसावर स्क्रू घट्ट बसवा. दोन स्क्रूंना तांब्याची तार जोडा. विजेची वायर एक वरून आणि एक खालून जोडा. स्प्रिंग ३५ सें.मी. लांबी व ४ सें.मी. रुंदी असलेल्या फळीच्या टोकाला आणि चौरसाला जोडा.

विद्युत वायरी ट्रान्सफॉर्मरला लावून त्या प्लगच्या साहाय्याने स्विच बोर्डवर लावा. स्विच सुरू केल्यावर तांब्याची तार तापेल आणि थर्मोकोल त्या गरम तारेमुळे कापला जाईल.

मित्रांनो, एरवी आपण कात्रीने कोणतीही वस्तू कापताना वस्तू न हलविता कात्री पुढे पुढे सरकवित असतो. येथे त्याच्या अगदी उलट क्रिया आहे. कापण्याचे साधन (तांब्याची तार) एकाच जागी राहील. आपण थर्मोकोलच फिरवायचा आहे. या कटरमुळे थर्माकोल कसाही गोल, सरळ, तिरका, नागमोडीसुद्धा कापता येईल. यासाठी आपल्याला जसा थर्मोकोल कापायचा आहे ते चित्र पेन्सिलने थर्मोकोलवर काढून घ्यावे लागेल. मग तो हवा तसा कापता येईल.

या कटरमुळे तुम्हाला नाजूक नक्षीकामही सहज करता येईल.


## तुमच्या घरी हवीच

| नुकतीच प्रकाशित झालेली पुस्तके | | किंमत |
|---|---|---|
| १. प्रतिभेच्या प्रांतातील प्रवास | – डॉ.अशोक निरफराके | ३०/– |
| (ललित लेखन शिकण्याचा मूलमंत्र देणारे पुस्तक) | | |
| २. कल्पक बनू या | – डॉ. अशोक निरफराके | ५०/– |
| (कल्पनाशक्ती कशी वाढवायची याची गुरुकिल्ली सांगणारे पुस्तक | | |
| ३. गिर्याराहणगाथा | – श्री. आनंद पाळंदे | ४०/– |
| (गिर्यारोहणाची प्रेरणा निर्माण करणारे व माहिती देणारे पुस्तक) | | |
| ४. राष्ट्रदेवो भव | – डॉ. वि. वि. पेंडसे | ५०/– |
| (प्रबोधिनीचे आद्य संचालक कै. आप्पा पेंडसे यांच्या वैचारिकांचे संकलन) | | |
| ५. असे घटते सुंदर अक्षर (दुसरी आवृत्ती) | – प्रा.अशोक ताकमोगे | १०/– |
| (हस्ताक्षर सुधारण्यासाठी अनुभवातून तयार झालेली पुस्तिका) | | |

# अभ्यास आनंददायी होण्यासाठी...

प्रा. महेन्द्र सेठिया

**अभ्यासातील स्वावलंबन**

**शा**ळा सुरू होऊन दोन महिने झाले. नव्या इयत्तेत नवीन पुस्तकांमधील बराच अभ्यासक्रम शिकून झाला असेल. घटक चाचणी समोर येऊन ठेपली असेल अन् त्याचमुळे अभ्यास करण्याची गरज जाणवू लागली असेल. तर असा हा अभ्यास अधिक रंजक कसा करता येईल, विविध विषयांचा, विविध पद्धती वापरून अभ्यास कसा करता येईल? हे या लेखमालेतून आपण समजून घेणार आहोत. या पहिल्या लेखात गेल्या वर्षभरात आलेल्या विविध मुद्यांचा थोडक्यात आढावा आपण घेऊ. म्हणजे पुढील लेखापासून आपल्याला पुढे जाता येईल. नाहीतर 'पुढचे पाठ... मागचे सपाट' असे व्हायची शक्यता जास्त.

**अभ्यास काय करायचा?**

प्रारंभी काय काय प्रकारचा अभ्यास करता येईल याची यादी तयार करा. उदा. धडा शिकवण्यापूर्वी व नंतर वाचणे. आकृत्यांचा सराव, तक्ते तयार करणे, प्रश्नोत्तरे लिहिणे, टिपणे काढणे, गणिते सोडवणे, प्रयोग करून पाहणे, शब्दकोश वापरणे, पाठांतर, मनन करणे, पत्रलेखन-निबंधलेखन, शुद्धलेखन, हस्ताक्षरलेखन, सराव प्रश्नपत्रिका सोडविणे इत्यादी. ही यादी मोठी करता येईल. त्यामध्ये प्रामुख्याने अभ्यासाचे तीन प्रकार होतात. पाठ्यांश समजण्यासाठी केलेला अभ्यास, समजलेले अधिक पक्कं व्हावं, ते सहज लक्षात राहावं यासाठी केलेला अभ्यास अन् मूलभूत अभ्यासाची कौशल्ये वाढवीत, पाठ्यांशा बाहेरचे काही ज्ञान आपल्याला असावे, त्यातून मूळ विषयाचे अधिक व समतोल आकलन व्हावे यासाठीचा अभ्यास. अशापद्धतीने वर्गवारी करून अभ्यासाची यादी केली की हे सर्व करायला खूप वेळ लागेल हे लक्षात येईल. त्यासाठी वेळेचे नियोजन करावे लागेल.

**वेळेचे नियोजन**

आठ दिवस रोजचा २४ तासांचा हिशोब दर्शविणारा दिनक्रम लिहून काढा. सर्वसाधारणपणे कोणत्या गोष्टीसाठी आपण किती वेळ खर्च करतो (उदा. झोप आठ तास, शाळा सहा तास, खेळ एक तास अशाप्रकारे) ते लिहा. त्याप्रमाणे

अभ्यासाला किती आणि कोणता वेळ मिळतो ते शोधा. हा वेळ दोन तासांपेक्षा कमी असेल तर वेळापत्रकातल्या कोणत्या गोष्टी कमी करता येतील ते पाहा अन् चार तासांपेक्षा जास्त असेल तर छंद, खेळ, अवांतर वाचन यासाठी पुरेसा वेळ ठेवला आहे ना याची खात्री करून घ्या. एकदा दिवसभरात केव्हा - केव्हा किती वेळ अभ्यास करायचे ठरले की आठवड्याचा एक साप्ताहिक नियोजनाचा तक्ता (खाली नमुना दिला आहे.) तयार करा व त्यामध्ये अभ्यास काय करायचा, या मध्ये केलेल्या यादीतील अभ्यास भरत चला. असे करताना तुमचं लेखन-वाचन-पाठांतर-आकृत्या काढणे, गणिते सोडविणे इ. चा ढोबळ वेग तुम्हाला माहीत असायला हवा.म्हणजे कोणत्या प्रकारच्या अभ्यासाला किती वेळ लागेल हे ठरविता येईल.आवडीच्याच विषयांचा फक्त अभ्यास करू नका. एका आठवड्यामध्ये मिळून साधारणपणे सर्व विषयांना पुरेसा न्याय मिळेल याप्रमाणे अभ्यासाची योजना करा. गृहपाठ, शाळेच्या अभ्यासाबरोबर स्वत:च्या अभ्यासाचेही तपशिलात नियोजन करा. नुसता इंग्रजीचा अभ्यास असे न म्हणता इंग्रजीतल्या अमुक धड्याचे वाचन व अवघड शब्दांचे स्पेलिंग व अर्थ पाठ करणे, असे नेमके लिहा. गृहपाठ, लेखन शक्यतो रात्री तर पाठांतर, नवीन समजून घेणे, अवघड विषयांचा अभ्यास शक्यतो सकाळी करावा. अभ्यासाचे नियोजन करताना आदर्शवादी नियोजन न करता व्यवहारातील अडथळे, अडचणी, संभाव्य कार्यक्रम, त्यात जाणारा वेळ इ. सर्वांचा विचार करून नियोजन करा. ते पुरेसे लवचिक ठेवा. त्यात जाणारा वेळ इ. सर्वांचा विचार करून नियोजन करा. ते पुरेसे लवचिक ठेवा. त्यात काही बदल

## साप्ताहिक नियोजन तक्ता-एक नमुना

| वार/वेळ | स. ६-३० ते ७-३० | ८ ते ९-३० | ९-४५ ते ११ | सायं. ७-३० |
|---|---|---|---|---|
| ते ९-३०<br>सोम<br>कोणता<br>अभ्यास? | | | | |
| अभ्यास<br>कसा झाला? | | | | |
| मंगळ | | | | |

करावे लागले तर जरूर करा.

**अभ्यासात चित्त कसे लागेल?**

असे नियोजन करूनही काही वेळा (काहींच्या बाबतीत बहुतेक वेळा) अभ्यासात लक्ष लागत नाही. तुमच्या भाषेत 'आज मूड नाही' असे आपण म्हणतो. त्यामुळे दोन दोन तास पुस्तके-वह्या समोर असूनही अभ्यास म्हणावा तसा होत नाही. त्यात समाधान किंवा मजा येत नाही. स्वत:चं चित्त त्यात नसतं. म्हणजेच अभ्यासाची परिणामकारकता कमी होते. हे टाळण्यासाठी अभ्यासाला बसण्यापूर्वी ५ ते १० मिनिटे स्वस्थ व शांत बसा. दीर्घ श्वास घेत सर्व ताण काढून टाका. दीर्घ ॐकाराचा उच्चार करत चित्त स्थिर, एकाग्र करण्याचा प्रयत्न करा. माझा अभ्यास उत्तम होणार आहे, मला यातून आनंद मिळणार आहे असे मनोमन म्हणा. सकाळी अभ्यासाला बसण्यापूर्वी १०-१५ मिनिटांचा हलका फुलका व्यायाम (योगासने, सूर्यनमस्कार इ.पैकी) करावा. त्यामुळे शरीर अभ्यासाला तयार होईल व प्रत्यक्ष अभ्यासाला बसल्यावर नियोजनाप्रमाणे ज्या विषयाचा अभ्यास आपण करणार आहोत त्यासंबंधी डोळे मिटून दोन मिनिटे आठवायचा, त्या विषयात, धड्यात डोकवायचा प्रयत्न करा. आता त्या बाबत असा असा



अभ्यास करायचा आहे, असे डोळ्यांसमोर आणून मग प्रत्यक्ष अभ्यासाला प्रारंभ करा. त्या विषयाचा ठराविक अभ्यास पूर्ण झाल्यावर पुन्हा दोन मिनिटे डोळे मिटून आपण काय काय अभ्यास केला याचे मनन करा. रोजच्या नियोजनात कोणत्याही एका विषयाचा अभ्यास सलग १ ते १ ।। तासांपेक्षा जास्त शक्यतो करू नका. तसेच भराभर १०-१० मिनिटांनी विषयही बदलू नका. (गृहपाठ व रोजचा अभ्यास उदा. इंग्रजीची १० स्पेलिंग पाठ करणे, चार गणिते सोडविणे, इत्यादी अभ्यासाचे प्रकार सोडून) एक तासाच्या अभ्यासानंतर पाच मिनिटे मोकळीक घ्या. थोडे हातपाय मोकळे करा. एखादी फेरी मारा. हलके फुलके वाचा. जाता जाता काही दाणे, चुरमुरे खा आणि पुन्हा अभ्यासाला लागा. अभ्यासाची जागा कायम शक्यतो एकच ठेवा. अन् अभ्यास करून उठल्यावर ती जागा आवरून ठेवा. म्हणजे नवीन दिवशी, नवीन वेळी अभ्यास सुरू करताना

पसारा आवरण्यापासून सुरुवात करावी लागणार नाही. या सर्वांमुळे शरीर, मन, बुद्धी अभ्यासाला पूरक होऊन अभ्यास अधिक आनंददायी, प्रसन्न चित्ताने होईल.

**लक्षात राहण्यासाठी काही तंत्रे**

जाहिरात तंत्राचा वापर करून जे अवघड, शब्दश: जसेच्या तसे लक्षात ठेवावे लागणार आहे अशा गोष्टी चांगल्या सहज जाता येता पाठ होऊ शकतात. व्याख्या, प्रमेये, नियम, स्पेलिंग्ज, सूत्रे, आकृत्या, नकाशे असे एकेका विषयातील एक – दोन प्रकरणातील गोष्टी एका मोठ्या कागदावर स्केचपेन्सच्या साहाय्याने मोठ्या अक्षरात (१० फुटांवरूनही दिसू शकेल अशा अक्षरात) लिहून काढा व घरातील मोक्याच्या ठिकाणी, जिथे जाता – येता सहज लक्ष जाईल. अशा ठिकाणी ते लावा. दिवसभरात जास्तीत जास्त वेळा तो मजकूर पाहण्याचा, वाचण्याचा जाता – येता प्रयत्न करा. लक्षात राहण्यासाठी ध्वनिमुद्रकाचाही (टेप रेकॉर्डर) वापर करून अवघड संकल्पना-व्याख्या आपल्या आवाजात ध्वनिफितीवर ध्वनिमुद्रित करा व फावल्या वेळात झोपण्यापूर्वी, आवरणे चालू असताना ते ऐका. अशा या जाहिरात तंत्रातून अधिकाधिक गोष्टी सहज लक्षात राहतात.

याचबरोबर सारशब्द तसेच उत्तरातील महत्त्वाचे मुद्दे, टिपणे, तक्ते तयार करणे, छोटी छोटी कार्डस् तयार करणे अशी अन्यही तंत्रे आहेत. त्या सर्वांमधून अभ्यास लक्षात राहायलाही मदत होईल.

हा झाला गेल्या वर्षातल्या काही लेखांचा थोडक्यात आढावा. तपशिलात वाचण्यासाठी गेल्या वर्षीचे काही अंक पाहावेत. हवे असल्यास कार्यालयात विकत मिळतील. (किंमत प्रति अंक रु. ५/- पोस्टेजसह) ज्याचा तुम्हाला वर्षभराच्या अभ्यासासाठी उपयोग होईल. पुढील लेखांमध्ये अभ्यासाच्या अन्य पद्धती, स्वत:च कसं शिकायचं, आकृत्यांचा अभ्यास कसा करायचा, विविध विषयांप्रमाणे अभ्यासाच्या विविध पद्धती, इत्यादी विषय असतील. तुम्हाला अभ्यासात काही शंका असल्यास, अडचणी असल्यास, या लेखमालेत अजून काय हवे असे सुचवायचे असल्यास आवर्जून सुचवावे. लेख लिहिताना त्याचा निश्चितपणे विचार केला जाईल. मनसोक्त, आनंददायी अभ्यासासाठी मन:पूर्वक शुभेच्छा!

# प्रेरणादायी ध्वज

**स्वातंत्र्य दिनानिमित्त**

**१५** ऑगस्ट आणि २६ जानेवारीला आपण ध्वजारोहण करून ध्वजवंदन करतो. पण असे का करायचे? ही पद्धत कशी सुरू  झाली याची माहिती घेणे तुम्हाला नक्कीच आवडेल.

ध्वज वापरण्यास सर्वप्रथम कोणी, कुठे सुरुवात केली याचा निश्चित उल्लेख कुठेच आढळत नाही. परंतु भारत व चीन यांच्याकडून ध्वज फडकविण्याची परंपरा पश्चिमेकडे गेली असावी असे इतिहासावरून वाटते. मानाचे, यशाचे तसेच आदर्शाचे चिन्ह त्याचप्रमाणे संदेशवहनाचे साधन म्हणून ध्वजाचा उपयोग प्राचीन काळापासून केला जातो. काठीला एखादी विशिष्ट प्रतिमा बांधून जे खुणेचे निशाण तयार करीत तेच ध्वजाचे आद्य स्वरूप म्हणता येईल. लढाईमध्ये निरनिराळी पथके, तुकड्या, पक्ष हे दूरवरून दिसावेत, यासाठी अशा चिन्हांची – निशाणांची गरज निर्माण झाली आणि रणांगणावर अनेक ध्वज फडकू लागले. सैन्याला प्रेरणा देण्याचे कार्यही ध्वज करू लागले. कापडाची निर्मिती आणि रंगकाम या कला अवगत झाल्यानंतर अत्यंत आकर्षक ध्वज तयार केले जाऊ लागले. महाभारत, युक्तिकल्पतरू, अपराजितपृच्छा या ग्रंथांमध्ये ध्वजांची वर्णने आहेत.

भारताचा राष्ट्रध्वज तिरंगा कसा तयार झाला, हे जाणून घ्यायचे आहे का? २२ ऑगस्ट १९०७ रोजी जर्मनीमध्ये स्टुटगार्ट येथे एक आंतरराष्ट्रीय परिषद भरणार होती. या परिषदेसाठी मादाम कामा या राष्ट्रभक्त भारतीय महिलेने स्वत:च्या कल्पनेतून तिरंगी निशाण तयार केले आणि भारताचा राष्ट्रध्वज म्हणून सादर केले. या निशाणामध्ये हिरवा, केशरी, तांबडा असे तीन आडवे पट्टे होते. भारताचे राष्ट्रीय फूल समजल्या जाणाऱ्या कमळाची आठ चित्रे – हिरव्या पट्ट्यात, तर वंदेमातरम् ही अक्षरे केशरी पट्ट्यात आणि सूर्य – चंद्र यांची चित्रे तांबड्या पट्ट्यात असा हा ध्वज होता. मात्र हा ध्वज भारतात कधीही वापरला गेला नाही.

झाडे झाली हिरवीशी, शीळ घुमते रानात। ओल जांभळ्या मेघांची वाहे नदीच्या पाण्यात

यानंतर राष्ट्रध्वज कसा असावा, याबद्दल अनेक पातळींवर चर्चा झाली. वेळोवेळी लेख लिहिले गेले व १९३१ साली केशरी, पांढरा, हिरवा या रंगांचे पट्टे असणारा ध्वज तयार करण्यात आला. त्याग - धैर्य, सत्य - शांतता, प्रेम - विश्वास या गुणांचं प्रतीक म्हणून हे रंग निवडण्यात आले. वरती केशरी, मध्यभागी पांढरा आणि खालच्या बाजूला हिरवा असे पट्टे आहेत. मधल्या पांढऱ्या पट्ट्यावर गडद निळ्या रंगाचे अशोकचक्र आहे. त्याला २४ आरे आहेत.

राष्ट्रध्वजाला द्यावयाचा मान, त्याच्या वापराबद्दलचे नियम, राष्ट्रीय शोक - आनंद, स्वागतप्रसंगी तो कसा उभारतात यांच्याबद्दल काही संकेत - नियम निश्चित केलेले आहेत. त्यानुसारच राष्ट्रध्वजाचा उपयोग केला जातो. भारताचा राष्ट्रध्वज आणि त्याच्या वापराविषयीचे नियम २२ जुलै १९४७ रोजी संविधान संमितीने मंजूर केले.

राष्ट्रध्वज सुती, लोकरी अथवा रेशमी असावा.

खादी - हातमागाचा असावा असा आग्रह महात्मा गांधीजी करीत असत. ध्वजाच्या बाजू ३ : २ या प्रमाणात असतात. निशाणाचा अधिकृत आकार पाच (लहान, मोठे) आहेत.

१) २१ फूट ह्न १४ फूट
२) १२ फूट ह्न ८ फूट
३) ६ फूट ह्न ४ फूट
४) ३ फूट ह्न २ फूट
५) ९ इंच ह्न ६ इंच

राष्ट्रीय निशाण हा भारताचा मानबिंदू असल्याने ध्वजारोहणाची जागा सर्वांत उंच असावी. ध्वजारोहण होण्याआधीपासून ते सायंकाळी ध्वजावतरण होईपर्यंत ध्वजाचा कोणत्याही प्रकारे अवमान होऊ नये म्हणून आणि ध्वजाची देखभाल करण्यासाठी दोन ध्वज संरक्षक नेमावेत, असे भारतीय राष्ट्रध्वज संहितेमध्ये नमूद केले आहे.

ध्वजारोहण करणाऱ्या व्यक्तीने डोक्यावर टोपी घालावीच असाही नियम आहे. परंतु अलीकडे हा नियम पाळला जात नाही ते अत्यंत चुकीचे आहे. सूर्योदयाचे वेळी ध्वजारोहण आणि सूर्यास्ताच्या वेळी ध्वजावतरण केले जावे. फाटलेला अथवा चुरगाळलेला ध्वज लावू नये. ध्वजारोहणाचे स्थान, संचलन मार्गापासून चार - पाच मीटरवर असावे असा संकेत आहे.

# असे उघडले सुरभिने खाते !

सुवर्णा जोशी

ज्ञान व्यवहाराचे

सुरभि आठवीतून नववीत गेली. चांगल्या गुणांनी उत्तीर्ण झाली. त्यांची कामवाली लक्ष्मीबाई हिच्या भाषेत 'सुरभिबाय लई गुणाची पोर. अगदी सगळं व्यवहाराचं या पोरीला ठावं हाय.' सुरभिने आपल्या अभ्यासाबरोबरच लक्ष्मीबाईला लिहितं केलं होतं. तिला लिहा-वाचायला शिकवण्याचा छंदच जणू सुरभिला लागला होता व हे करताना शाळेतल्या बाईंची नक्कलही ती करीत असे. लक्ष्मी स्वत:चं नाव लिहायला लागली. सही करायला लागली, आता तिला बचतीचे महत्त्व सुरभिच्या आईने पटवून सांगितले होते. त्यामुळे बँकेत खाते उघडून पैसे जमा करायचं लक्ष्मीबाईंनी ठरवलं ! पण खाते उघडायचे म्हणजे काय? त्यासाठी काय करावं लागतं? आपल्याला पाहिजे त्या वेळी पैसे एकदम मिळणार का? एक ना दोन असे असंख्य प्रश्न लक्ष्मीबाईंना पडले. पहिला प्रश्न खातं कसं उघडायचं, हाच महत्त्वाचा! लक्ष्मीबाईंनी तिला 'शहाणी' वाटणाऱ्या सुरभिला गाठलं आणि आपली अडचण सांगितली अन् म्हणाली ''सुरभि, तू शिकणारी, चल माझ्याबरोबर खातं उघडायला बँकेत.''




सुरभिला आतापर्यंत स्वत: एकटं बँकेत जाऊन खातं उघडण्याची वेळच आली नव्हती. त्यामुळे नक्की काय करायचं हे तिलाही माहीत नव्हते, पण सुरभिने ठरवलं की, लक्ष्मीबाईंच्या निमित्ताने आपल्यालाही या व्यवहाराची माहिती करून घेता येईल. सुरभिच्याच शेजारच्या बंगल्यात राहणाऱ्या कर्वेकाकू बँकेत अधिकारी होत्या. सुरभि त्यांच्याकडे गेली आणि म्हणाली,

सृष्टीत सुखाची करीत पेरणी। आनंदाचा घनी श्रावण आला।।

''काकू आमच्या लक्ष्मीबाईंना बँकेत खातं उघडायचंय तर मी काय करू?'' कर्वेकाकूंनी सांगितलं, ''बँकेच्या खात्यांचे वेगवेगळे प्रकार असतात. आवर्ती, बचत, चालू खाते यापैकी लक्ष्मीबाईंना बचत खाते उघडायचे आहे नं? मग त्याविषयीच आज तुला मी माहिती सांगते.''

''आता नवीन नियमांप्रमाणे ज्या व्यक्तीचे खाते उघडायचे तिचे दोन फोटो (छायाचित्रे) लागतात. एक फोटो पासबुकावर असतो, तर दुसरा बँकेच्या रजिस्टरला लावतात. यामुळे दुसऱ्याच्या नावावरचे पैसे कोणाला काढता येत नाहीत. तसंच आधी कमीत कमी शंभर रुपये जमा करून खाते उघडावे. बँकेच्या विहित ठराविक नमुन्यातील अर्ज भरायचा, नमुन्याची सही करायची. बँकेत खाते असणारे (खातेदार) किंवा त्या बँकेचे कर्मचारी यांची सहीसुद्धा 'ओळख' म्हणून लागते. लक्ष्मीबाईंच्या अर्जावर ओळखीसाठी मीच सही करीन हं!'' असेही आश्वासन कर्वेकाकूंनी यावेळी दिले.

थोडं थांबून कर्वेकाकू पुढे म्हणाल्या, ''सुरभि लक्ष्मीबाईंना अगदी समजेल असं बजावून सांग, सही एकच करीत जा. सहीत थोडा जरी बदल झाला तरी बँकेचे अधिकारी पैसे काढताना अडवतात. खाते उघडण्यासाठी पैसे, भरलेला अर्ज व फोटो दिल्यानंतर एक-दोन दिवसांनी बँकेत जाऊन पासबुक आणावे लागते. त्यावर आपला खाते क्रमांक किती आहे हे लिहिलेले असते. आता यानंतर पैसे ठेवायचे आणि काढायचे कसे हे ही लक्ष्मीबाईंना तू सांग ह!''

''बहुतेक सर्व बँकांमध्ये पैसे घेण्यासाठी (स्वीकारणे) आणि पैसे देण्यासाठी अशा दोन स्वतंत्र खिडक्या असतात. तेथे बँकेचे कर्मचारी असतात. पैसे काढताना-ठेवताना छापील स्लीप भरून द्यावी लागते. या स्लीपवर तुमचे नाव, खातेक्रमांक, तारीख, किती रक्कम काढायची तेवढी अक्षरामध्ये आणि अंकामध्ये लिहावी लागते. सही करावी लागते. ही स्लिप आणि आपल्याकडील पासबुक बँकेच्या कर्मचाऱ्याकडे दिले की, त्याच्यासमोर स्लिपच्या मागील बाजूस आणखी एकदा सही करावी लागते. आपल्या खात्यावरील पैसे दुसऱ्याने काढण्याची वेळ आली तर प्रत्यक्ष पैसे काढणाऱ्याची सही येथे असावी या उद्देशाने येथे सही करावी लागते. यानंतर कर्मचारी आपल्याला 'टोकन' देतो. ज्यावेळी त्यावरचा क्रमांक किंवा आपले नाव पुकारले जाईल त्यावेळी आपण खिडकीशी जाऊन पैसे काळजीपूर्वक

मोजून घेतले पाहिजेत.''

''पैसे खात्यात भरतानाही स्लिप भरावीच लागते. त्यामध्ये आपण कितीच्या किती नोटा म्हणजे, शंभर रुपये भरणार असू, तर १० च्या पाच आणि पन्नासची एक नोट (१० ह्न ५ = ५०, ५० ह्न १ = ५०) असा रकमेचा – नोटांचा तपशील लिहिणे आवश्यक आहे. पैसे भरल्याची नोंद तुमच्या पासबुकात लगेच होतेच असे नाही, त्यामुळे आपण स्लिपचा डावीकडील भाग शिक्का मारून बँक आपल्याकडे देते. तो भाग जमेची पासबुकात नोंद होईपर्यंत तरी जपून ठेवावा. विशेषत: आपण जर बँकेत धनादेश (चेक) जमा केल तर धनादेशाचा क्रमांक लिहिणे अत्यंत आवश्यक आहे,'' अशीही माहिती कर्वेकाकूंनी दिली.

''आता व्याजाचे काय?'' सुरभिने कुतूहलाने विचारले. ''त्या महिन्यात तुमच्या खात्यावर किमान किती रक्कम आहे हे पाहून बँक व्याज देते. साधारण तीन महिन्यांनी व्याज जमा करतात. काही बँकांनी आपल्या सोयीनुसार व्याज किती महिन्यांनी जमा करायचे हे ठरविले आहे.'' कर्वेकाकूंनी दिलेल्या सर्व माहितीमुळे बँकेत खाते उघडण्याचा प्रसंग यापूर्वी कधी आलेला नसताना सुरभि न बिचकता लक्ष्मीबाईंच्या बरोबर बँकेत गेली आणि काम फत्ते करून आली!

लक्ष्मीबाई पुन्हा एकदा म्हणाली, ''खरंच! शहाणी गं, सुरभिबाय!''

खातं उघडण्याची माहिती घेतली, लक्ष्मीबाईंचं खातं उघडूनही झालं. आता सुरभिला आपलंही खातं बँकेत असावं असं वाटायला लागलं. आई–बाबांच्या मागे लागून सुरभिने बँकेत स्वत:च्या नावाचं खातं उघडण्याचा हट्ट अखेर पूर्ण करवून घेतला. पण... सुरभि अजून लहान–कायद्याच्या भाषेत बोलायचं तर अज्ञान होती. त्यामुळे तिला तिच्या आईबरोबर संयुक्त खातं उघडावं लागलं. तसं बाबांच्या बरोबरही उघडता आलं असतं; पण बाबांच्या कामाची वेळ! हा प्रश्न सोडविण्यासाठी तिनं आईबरोबर खातं उघडलं. बक्षीस म्हणून मिळालेले धनादेश, पैसे सुरभिनं आपल्या खात्यात जमा केले.

पैसे काढताना मात्र आईचीही सही तिला घ्यावी लागत असे. आणखी काही वर्षांनी सुरभि सज्ञान झाली की (१८ वर्षांची) आपोआपच तिला स्वतंत्रपणे पैसे ठेवता – काढता येतील. पण, आपलंही खातं आहे, पासबुक आहे. याचाच आनंद, अभिमान सुरभिला अधिक होता. असा आनंद तुम्हालाही नक्की मिळवता येईल.

# कूट श्लोक

**डॉ. भाग्यश्री हर्षे**

मित्रांनो, वेगवेगळी कोडी सोडविणे हा तर तुमचा आवडता छंद आहे. अशी मनोरंजक कोडी संस्कृत भाषेतसुद्धा आहेत. जशी शब्दकोडी आहेत तसेच कूटश्लोकही आहेत. संस्कृतात प्रहेलिका किंवा कूट म्हणजे कोडे. अशा काही प्रहेलिका या अंकाद्वारे तुमच्यापर्यंत येत आहेत. मग शोधणार ना त्यांची उत्तरे?

**१) अपदो दूरगामी च साक्षरो नैव पण्डितः ।**
**अमुखः स्फुटवक्ता च यो जानाति स पण्डितः ।।**

(जो पाय नसूनही दूरवर जातो, जो साक्षर असूनही पंडित नाही, मुख नसूनही स्पष्ट बोलतो तो कोण?)

**२) भोजनान्ते च किं पेयं जयन्तः कस्य वै सुतः ।**
**कथं विष्णुपदं प्रोक्तं तक्रं शक्रस्य दुर्लभम् ।।**

(भोजनानंतर काय प्यावे? जयंत कोणाचा पुत्र आहे? विष्णुपद हे कसे आहे? इंद्राला ताक दुर्लभ असते.)

(श्लोकातील पहिल्या तीन चरणांत विचारलेल्या प्रश्नांची **उत्तरे श्लोकातच शोधा)**

**३) तातेन कथितं पुत्र पत्रं लिख ममाज्ञया ।**
**न तेन लिखितं पत्रं पितुराज्ञा न लङ्घिता ।।**

(वडिलांनी सांगितले – 'हे मुला, माझ्या आज्ञेनुसार पत्र लिही.' त्याने (पुत्राने) पत्र लिहिले नाही व वडिलांची आज्ञाही उल्लंघिली नाही) हे कसे?

**(या कूट श्लोकातील उत्तरे याच पानावर शोधा)**

संस्कृत साहित्यातील हिरा असे महाकवि कालिदासाला संबोधले जाते. या महाकविची प्रसिद्ध साहित्यसंपदा कोणती ते तुम्हाला माहीत आहे का?

महाकवि कालिदासस्य प्रसिद्धाः कलाकृतिः– **महाकाव्ये – १) रघुवंशम् २) कुमारसम्भवम्**
**खण्डकाव्ये** – १) ऋतुसंहारम् २) मेघदूतम् **नाटकानि** – १) अभिज्ञान शाकुन्तलम् २) मालाविकाग्निमित्रम् ३) विक्रमोर्वशीयम्

**कूटश्लोकाची उत्तरे**१. पत्र  २. ताक, इंद्र, दुर्लभ३. नतेन – या शब्दाची फोड दोन पद्धतीने करता येईल. न तेन – लिखितिम् – त्याने लिहिले नाही. नतेन – नम्रपणाने

टपटप आले थेंब टपोरे त्या स्पर्शाने अंग शहारे

# हिंदीकी रोचकता

**चारूता पुराणिक**

अपनी राष्ट्रभाषा

**भा**षा कौनसी भी हो उसे रोचक बनाने के लिए कुछ ऐसे शब्द, वाक्योंका प्रयोग किया जाता है, जिससे भाषा में जान आ जाती है। हिंदी भाषा सिखते वक्त ऐसे कई 'वाक्यांश' आते हैं, उन्हे 'मुहावरे' कहते हैं। ये मुहावरे और क्या करते हैं? वें भाषामें सरसता, सरलता और सहजता लाते हैं। उनके प्रयोगसे भाषामें सौंदर्य, प्रवाह, विलक्षणता आदि बातें अनायास आती है। इससे लेखन अधिक चुस्त, सशक्त और प्रभावशाली बनता है।

अब देखिए, यहाँ दो वाक्य दिए गए हैं, मुहावरों का प्रयोग करके वाक्यमें कितना परिवर्तन होता है?

***१) ''यदि प्रारंभ से ही दुष्ट की दुष्टता का उत्तर पूरी कठोरतासे देते तो शत्रुओं के हौसले नहीं बढते।''***

***अब यही वाक्य अलग अंदाज से नीचे लिखा है,***

***२) ''यदि प्रारंभ से ही ईट का जवाब पत्थर से देते, तो शत्रुओं के हौसले नहीं बढते।''***

दूसरा वाक्य 'ईटका जवाब पत्थरसे देना 'इस मुहावरे का प्रयोग करके लिखा है। इससे वाक्य अधिक सशक्त बना है।

हिंदी भाषामें ऐसे कई अर्थपूर्ण मुहावरें हैं, जिनके प्रयोगसे आप ''गागरमें सागर भर सकते हैं।'' मुहावरोंका हमेशा लाक्षणिक अर्थ लिया जाता है। उनका अपना विशिष्ट अर्थ होता है। यहाँ कुछ मुहावरें और उनके अर्थ दिए हैं, जिनका प्रयोग आपको अपने लेखनमें, बातचीतमें अवश्य करना है। वैसे आप अपने पाठ्यपुस्तकोंमेंसे कई मुहावरें पढाई के वक्त जानते हैं। इनका संग्रह करके अपना 'मुहावरा कोश' बना सकते हैं। अपने हाथोंसे हम लिखते हैं, काम करते हैं, खाते हैं, बाल सँवारते हैं, चित्र खींचते हैं, दूसरों को मारते भी हैं। ऐसे हाथोंके बारेमें कई मुहावरें हैं। जिनके कारण भाषा के वैभव की

पहचान होती हैं।
१) हाथ साफ करना (खूब लूटना) - चोरोंने जौहरीया के सब मालपर **हाथ साफ कर दिया।**
२) हाथ मलना (पछताना)
- समयपर अध्ययन करो, कही बादमें **हाथ न मलने पड़े।**
३) हाथ धोना (खो देना)
- हड़ताल में भाग लेकर उसे अपनी नौकरीसे **हाथ धोना पड़ा।**
४) बाएँ हाथ का खेल (आसान काम)
- चित्र खींचना तो उसके **बाएँ हाथ का खेल है।**
५) हाथ रंगना (खूब धन कमाना) - हिमाचल प्रदेशमें जमिन खरीदकर कई नेताओंने अपने **हाथ रंग लिए हैं।**
६) हाथों के तोते उड़ जाना (बहुत घबरा जाना)
- रास्ते में हुए अपघात का दर्दभरा दृश्य देखकर राजूके **हाथों के तोते उड़ गए।**
७) हाथ फैलाना (सहायता माँगना)
- सबके सामने **हाथ फैलाने** की आदत उचित नहीं है।
८) हाथ उठाना (मारपीट करना)
- स्त्रीपर **हाथ उठाना** अच्छा नहीं।
९) हाथ धोकर पीछे पड़ना



(पूरी तरह पीछे पड़ना)
**- हाथ धोकर** पीछे पड़े बिना वह पढ़ाईही नहीं करता।
१०) हाथ पर हाथ रखकर बैठना (खाली बैठना, निकम्मे रहना)
- बरसात न होने के कारण किसान **हाथपर हाथ रखकर बैठे हैं।**
११) हाथ बँटाना (सहायता देना)
- भूचालग्रस्तोंको फिरसे अपने घर बनाने के लिए कई लोगोंने **हाथ बटाँएँ।**
१२) हाथ-पैर मारना (उद्योग करना)
- कही **हाथ पैरे मारे,** तो खाने - पिने की चिंता दूर होगी।

देवा पाऊस पाऊस तुझ्या डोळ्यातले आस। दैवा तुझी रे हायस, जीवा, तुझी रे मिजास।।

# मी कीटक बोलतोय !

**वैभव आराध्ये** इ. १०वी, केशवराज विद्यालय, लातूर.

मुलांचे पान

**ख**ळखळ वाहणारे झरे, निळसर डोंगर, हिरवी वनराई, किलबिल करणारे पक्षी असे हे सृष्टीचे मनोहर रूप आहे. ही सृष्टी, हा निसर्ग म्हणजे एक न उलगडणारे कोडे आहे. हजारो प्रकारचे प्राणी आणि वनस्पती निसर्गात आपापल्या परीने जगत असतात. पाळीव प्राणी, जंगली प्राणी ह्या बरोबरच निसर्गाच्या या अफलातून दुनियेत आम्ही कीटकसुद्धा जगत असतो. नुसतंच जगत असतो असे नाही तर आमची स्वत:ची एक दुनिया असून त्याच्याविना मोठे प्राणी जगूच शकणार नाहीत अशी परिस्थिती आहे.




तसे पाहिले तर आम्ही अत्यंत दुर्लक्षित जीव असल्यामुळे आमच्याकडे कोणी लक्ष देत नाही. परंतु पावसाळी दिवसांमुळे कीटकांना प्रकाशात आणावयाचे ठरविलेले दिसतंय ! हे आमचे परमभाग्य समजतो. चला तर मग आमचे विश्व कसे आहे, याची माहिती आम्हीच तुम्हाला करून देतो. आमचा कीटक गट हा प्राणीसृष्टीतील सर्वात मोठा गट आहे. जीवनविषयक - बाबतीत, उदाहरणार्थ- शिशुसंगोपन, स्थापत्यकला, संरक्षण याबाबतीत आम्ही खूपच पुढे गेलो आहोत बरं का ! आणि हो, आजपर्यंत आमच्या जातींची संख्या 'अकरा लाखांच्या' घरात गेली आहे आणि नवनवीन जातींची भर पडतच आहे, तर लाखो जाती आणखी शोधावयाच्या आहेत, त्या वेगळ्याच ! या पृथ्वीतलावरील आमचे अस्तित्व सुमारे '३० कोटी' वर्षांपूर्वीपासूनचे

मृदुंगाच्या तालावर हातांचेच टाळ होती। पावसाच्या धारेसंगे रंगे पंढरीची माती ।।

आहे. तर आता आमच्या एकेका पैलूची सविस्तर ओळख करून देत आहोत.

''मंडळी, आम्ही जसे उपद्रवी आहोत तसेच उपयोगीदेखील आहोत म्हटलं !'' आम्ही नसतो तर तुम्हाला सफरचंद, द्राक्ष, लवंग हे पदार्थ तसेच फळभाज्या व कापड पण मिळाले नसते. मध, रेशीम, लाख हे पदार्थ पण दुर्मिळ झाले असते. आमच्यातील अनेक जण आपल्याच बांधवांवर उपजीविका करून निसर्गाचा समतोल राखण्यात मोलाची कामगिरी बजावतात. पण त्याचबरोबर आम्ही फार उपद्रवी आहोत बरं का! नुसतीच तुमची रात्रीची झोपमोड करतो असे नाही तर डोके खाजविणे, खरूज इथपासून ते कॉलरा, टायफॉईड यासारखे रोग पसरविण्यात पण आमचा क्रमांक पहिला आहे. त्यामुळे हजारो लोक मृत्युमुखी पडतात. यामुळे लोकसंख्येवर नियंत्रण ठेवण्याचा आम्ही अल्पांशाने प्रयत्न करीत आहोत. कारण तुमचे ते विज्ञान नवीन शोधामुळे आमच्या



काही बांधवांचा नायनाट करण्याच्या मागे लागलेले आहे.

**शाकाहारी कीटक** !

मित्रांनो, आमचे एक वैशिष्ट्य म्हणजे आमची विलक्षण प्रजोत्पादन क्षमता व कमीत कमी वेळात पूर्ण होणारा जीवनक्रम. वाळवीची राणी रोज सुमारे ३० ते ४० हजार अंडी घालते तर घरमाशी ५०० ते ६०० अंडी घालते. काही दिवसांतच त्यातून ४०० ते ६०० घरमाशा बाहेर पडतात. आमच्या राहण्याची जागा ही उंच पर्वतावर, पाण्यात, खोल दरीत, बर्फावर, जमिनीवर, माणसाच्या शरीरात तर काही पशु-पक्ष्यांच्या शरीरातही आहेत. आमच्यापैकी प्रत्येकजण मांसाहार करतो असे नाही तर काहीजण शाकाहारी असून काहीजण तर फक्त घनपदार्थच खातात.


जीवनसृष्टीतील शिशुसंगोपन, संरक्षण, सहजीवन, स्थापत्यकला अशा अनेक जीवनविषयक आविष्कारांचे दर्शन आमच्या कीटकसृष्टीत तुम्हाला पदोपदी घडेल. आमचा समावेश प्राणीसृष्टीतील सर्वात मोठ्या संधिपाद प्राणिसंघात होतो. कीटकवर्गात ढेकूण, गांधीलमाशा, गोमाशा, घरमाशा, ढालकीटक, चतुर, पतंग, फुलपाखरे यांचा समावेश होतो. आमच्या शरीरात हाडे नसतात, तसेच आमच्या शरीराचे तीन प्रमुख भाग पडतात. १) डोके २) छाती ३) पोट

डोक्याच्या भागात स्पर्शिकांची एक जोडी असते. पायाच्या तीन जोड्या व पंखांच्या दोन जोडया असतात. आमच्या शरीरावरील आवरणामुळे आम्हाला आकार प्राप्त होतो. डोक्याच्या भागात छोटा मेंदू असून शरीरात उत्सर्जन व श्वसनसंस्थाही असतात. आमच्या वाढीचे तीन प्रकार आढळतात. पैकी एका प्रकारात कीटक चार निरनिराळ्या जीवनावस्थांमधून जातो. १) अंडी २) अळी ३) कोष ४) कीटक

उदा. फुलपाखरे, मधमाशा, पतंग इत्यादी.

**कीटकसृष्टीचा पसारा**

मित्रांनो, आमच्या कीटक – सृष्टीचा पसारा फारच मोठा आहे. आमच्याकडे अर्धा मिलीमीटर लांबीच्या अतिसूक्ष्म अशा 'थ्रीप' व ट्रायकोप्टेरिडे' या कुळातील (आकार १/१/१०० इंच) कीटकापासून ते 'ॲटलास मॉथ' (लांबी १२ – १३ इंच) पतंगापर्यंत नानाविध कीटकांनी ही सृष्टी बहरली आहे. आमच्या कीटकसृष्टीची विभागणी एकूण ३२ गणांमध्ये केली आहे. संकटातून सुटण्यासाठी आमचे रंग, आकार, बदलण्याची क्षमता आमच्याकडे असून संरक्षणासाठी अवयव दिलेले आहेत. आमचे काही बांधव पाण्यात आयुष्य कंठतात. आमचे काही बांधव प्रकाश देणारे आहेत. प्रकाश देणारा काजवा



आमचाच जातभाई.

ही सर्व माहिती वाचून तुम्हाला आमच्याबद्दल आपुलकी वाटते की तिरस्कार ते माहीत नाही. परंतु अन्नधान्याचं, जंगलाचं व माणसांचं आरोग्य धोक्यात आणण्याबद्दल आमचा नायनाट करण्यासाठी विज्ञान आमच्यामागे हात धुवून लागले आहे. परंतु तुमच्यापैकी बरेच जण आम्हाला खाऊन आपली उपजीविका करतात. तसेच रेशीम, लाख, मधमाशी या कीटकांपासून मिळणाऱ्या उत्पादनांमुळे राष्ट्रीय उत्पादनात लाखो रुपयांची भर आमच्यामुळे पडत आहे, हे लक्षात ठेवले पाहिजे. शिवाय आमच्या परीने आम्ही निसर्गाचा समतोल राखण्याचे काम करतोच ना !

''जगा आणि जगू द्या'' असेच शेवटी म्हणावेसे वाटते !

## धडपडणारे प्रबोधक

सुट्टीमधील व्यक्तिमत्त्व विकसन शिबिरात प्रबोधक राख्या शिकले होते. त्यावरून साताऱ्यामधील प्रसन्न कोल्हटकर व रहाळकर यांच्या बरोबर दहा जणांनी राखी पौर्णिमेनिमित्त कच्चा माल आणून राख्या तयार केल्या. त्या विकून खर्च वजा जाता उरलेल्या रकमेतून त्यांनी वर्गातील गरजू मित्राला शैक्षणिक साहित्य आणून दिले. हा गट यापुढेही जमणार आहे. त्यांच्या उपक्रमास शुभेच्छा! असे उपक्रम आपल्यापैकी अनेकांनी केले असतील. ती नावीन्यपूर्ण धडपड आमच्यापर्यंत जरूर पोहोचवावी.

## 'छात्र प्रबोधन'ची स्थानिक कार्यालये

| | |
|---|---|
| **निगडी** | ज्ञान प्रबोधिनी नवनगर विद्यालय, पेठ क्र. २५, निगडी, पुणे ४४. ☎ ८४३८० |
| **सोलापूर** | ज्ञान प्रबोधिनी बालविकास मंदिर, डफरिन चौक, सोलापूर ☎ २५७८२ |
| **सातारा** | सौ. सुषमा हाडप, साकेत, एल.आय.सी. कॉलनी, शाहुपुरी बसस्टँडजवळ, सातारा. ☎ ५०००२ |
| **सांगली** | श्री. शैलेंद्र केळकर, ६९२, गावभाग, खाडिलकर गल्ली, सांगली. |
| **कोल्हापूर** | डॉ. शुभांगी कुलकर्णी (सोलापूरकर), आशीर्वाद हॉस्पिटल, बिनखांबी गणेश मंदिराजवळ, कोल्हापूर ☎ २१५३४ |
| **नाशिक** | सौ. साधना गाडगीळ, रामकृष्णधाम, श्रीरामवाडी, म. गांधी रोड, नाशिक ☎ ५७४८३०. |
| **मुंबई** | श्री. अनिल यशवंत दांडेकर, विश्वस्त : अवध्य चॅरिटिज, ५२ ए, सह्याद्री, बजाज हॉलसमोर, ५०, स्वामी विवेकानंद रोड, मालाड (प.) मुंबई - ६४ ☎ ८७२५३१९ |
| **ठाणे** | डॉ. अजित पवार, बी-२०, अहिल्या सोसा. घंटाळी रोड, ठाणे (प.) ☎ ५४२१०८७ |
| **पनवेल** | सौ. मेधा मयुरेश सोहोनी, पी. एल--१३-६ सेक्टर १७ सिडको कॉलनी, अभ्युदय बँकेमागे, नवीन पनवेल. |
| **रत्नागिरी** | कु. नीता अ. श्रीखंडे, २९२३, जोशीवाडा, नवी मंडई रस्ता, रत्नागिरी ☎ २२४८७ |
| **धुळे** | सौ. उषा पाठक, धुळे अर्बन बँक, गरूड बाग, धुळे ☎ २३४८७ |
| **चाळीसगाव** | प्रा. श्री. विंचूरकर, मुख्याध्यापक, गुरुकुल माध्यमिक विद्यालय, चाळीसगाव |
| **परभणी** | श्री. दिलीप राके, 'पारस' नाथनगर, परभणी किंवा बाल विद्यामंदिर, परभणी. |
| **औरंगाबाद** | कर्नल पी.एन.मोडक, प्लॉट नं. ३०६/३०७, सेक्टर नं.सी,एन-१ भक्तीनगर गणेश मंदिराजवळ, सिडको, नवीन औरंगाबाद ☎ ४८२६२६ |

***लातूर, अहमदनगर, जळगाव याठिकाणी स्थानिक कार्यालये सुरू करावयाची आहेत. इच्छुकांनी पत्रव्यवहार करावा.***

या कार्यालयांमध्ये मासिकाची वर्गणी भरून सभासद होता येईल. ज्ञान प्रबोधिनी व छात्र प्रबोधनद्वारा प्रकाशित विविध पुस्तके या कार्यालयांमध्ये विक्रीसाठी उपलब्ध आहेत. छात्र प्रबोधनसाठी आपले लेखन साहित्य या केंद्रावर आपण हस्ते देऊ शकाल. तेथून ते पुण्याला पाठविले जाईल. छात्र प्रबोधन द्वारा आयोजित विविध शिबिरांची व उपक्रमांची माहिती व नावनोंदणी येथे करता येईल.

**हे मासिक 'ज्ञान प्रबोधिनी' या संस्थेच्या मालकीचे असून सौर श्रावण २८, शके १९१७, १९ ऑगस्ट १९९५ या दिवशी प्रभात प्रिंटिंग प्रेस, येथे छापून ज्ञान प्रबोधिनी, पुणे येथून प्रसिद्ध केले आहे.**

अशा श्रावण लहरी, आता सर आता ऊन। राऊळात पावसाची घुमे प्रासादिक धून।।

## शिक्षण

१. ज्ञान प्रबोधिनी प्रशाला, पुणे
२. ज्ञान प्रबोधिनी नवनगर विद्यालय, निगडी
३. ज्ञान प्रबोधिनी बालविकास मंदिर, सोलापूर
४. कृषितांत्रिक विद्यालय, खेड शिवापूर
५. ग्राम प्रबोधिनी, साळुंब्रे
६. शिशुअध्यापक महाविद्यालय, सोलापूर
७. स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र
८. शैक्षणिक उपक्रम प्रशिक्षण व संशोधन केंद्र

## संशोधन

१. प्रज्ञा मानस संशोधिका
२. आयुर्वेद औषधी संशोधिका
३. संस्कृत संस्कृति संशोधिका
४. ग्रामीण तंत्रज्ञान संशोधिका (संकल्पित)

## संघटन

१. युवक विभाग
२. युवती विभाग
३. महाविद्यालयातील संघटन 'प्रचीती'
४. 'छात्र प्रबोधन' मासिक
५. ग्रामीण प्रज्ञा विकास योजना




## प्रशिक्षण व उत्पादन

१. संगणक व नेत्रतंत्रज्ञ प्रशिक्षण संस्था
२. सोल्डरिंग स्कूल, पुणे
३. कोटिभास्कर स्मृति उद्योग, शिवापूर
४. क्षणमाप विभाग, पुणे
५. उद्वाहक विभाग, पुणे
६. छायामुद्रण विभाग, पुणे

## ग्रामविकास

१. पाणलोट क्षेत्र विकास योजना
२. गोमसयंत्र योजना
३. स्वयंरोजगार प्रशिक्षण केंद्र
४. शिवगंगा महिला उद्योग

## आरोग्य

१. संजीवन रुग्णालय, पुणे
२. ग्रामीण सर्वकष आरोग्य योजना

*॥ हे स्फुरण येथुनि दशदिशांतराला जावो ॥*

टपाल नोंदणी क्र. छात्र प्रबोधन - PNCW / 349 तिकिटाशिवाय पाठविण्याचा परवाना क्र. १२८

# शतकातुनि.....

शतकातुनि द्रष्टयांचे स्वर निनादती
'अग्रेसर हिंदुराष्ट्र हिंदुसंस्कृती' असे स्वर निनादती ॥ध्रु.॥

इतिहासा ज्ञात असे शौर्य येथले
यज्ञाग्नी सर्वप्रथम येथ चेतले
देशास्तव प्रथम दिल्या इथुनि आहुती ॥१॥

परदास्ये होते जधि राष्ट्र पेरले
संतांनी सद्विचार येथ पेरले
स्वत्वाची टेवियली ज्योत जागती ॥२॥

स्वातंत्र्यास्तव कितीक अथक झुंजले
फाशीचे दोर कुणी हसत चुंबिले
रक्ताला चेतविती प्रखर त्या स्मृती ॥३॥

वादतसे ज्ञान इथे खडक फोडुनी
साकळल्या रूढींचे बंध तोडुनी
प्रतिभेला नित्य नव्या लाभती मिती ॥४॥

ध्य[illegible] चा[illegible]बन आज उसळु दे
कर्तृत्वा[illegible] स्वप्न उमलु दे
सं[illegible] हे आम्हि रथी अम्हिच सारथी ॥५॥

**संपर्क पत्ता :**

संपादक, छात्र प्रबोधन
ज्ञान प्रबोधिनी, ५१०, सदाशिव पेठ,
पुणे ४११ ०३० ☎ : ४७७६९१

**कार्यालयाची वेळ :** स. १० ते संध्या. ७

**या अंकाची किंमत :** रुपये ६/-

**वार्षिक वर्गणी :** रुपये ७५/-

**प्रकाशन दिनांक :** सौर १० श्रावण, शके १९१७
१ ऑगस्ट १९९५